मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १०९ ■ बुधवार, २३ जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४





# कोल्हापुरात सतेज पाटलांची व्यूहरचना !

## काँग्रेस उभारी धरणार?

### महायुतीतच 'पायओढ' स्पर्धा सुरू





कोल्हापूर : हॅलो प्रभात

**अलीकडील काळात महायुतीत सुरु असलेली परस्परांचे पाय ओढण्याची स्पर्धा, सत्ताधारी बाजूकडूनच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळत असल्याचा व्हायरल झालेला व्हिडिओ, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रिम प्रोजेक्ट असलेला शक्तिपीठ महामार्गाच्या पार्श्वभूमीवर आ.राजेश क्षीरसागर, आ.शिवाजीराव पाटील यांच्यावर समर्थनासाठी असलेला दबाव, या पार्श्वभूमीवर सर्व काही आलबेल असल्याचे महायुतीत दिसत नाही.**

या पार्श्वभूमीवर कोल्हापुरात विधानसभेला पराभव पत्करावा लागलेल्या काँग्रेसचे नेते सतेज उर्फ बंटी पाटील यांनी बाह्या सरसावल्या असून महायुतीतील बेबनावचा कोल्हापुरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत फायदा घेण्याच्या दृष्टिकोनातून त्यांची व्यूहरचना सुरू असल्याचे राजकीय जाणकारांतून व्यक्त केले जात आहे.

कोल्हापुरात शेतकऱ्यांनी नुकताच सातबाऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी भाजप-शिवसेना नेत्यांवर बंदुकीच्या दबावाखाली काम करत असल्याचा जो आरोप केला. त्यात निश्चितच तथ्य आहे. 'आग लागल्याशिवाय धूर निघत नाही, त्याप्रमाणे स्वार्थासाठी वरिष्ठांच्या आदेशाने हे नेते काहीही करू शकतात, शक्तिपीठाला समर्थनही करू शकतात, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

'तूझं माझं जमेना, तुझ्याशिवाय करमेना' अशीच स्थिती महायुतीत निर्माण झालेली आहे. सत्ताधाऱ्यांचेच व्हिडिओ बाहेर येत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका उंबरठ्यावर आलेल्या असताना नेते सोडून जात असतानाही सतेज पाटील यांनी जी व्यूहरचना आखण्यास प्रारंभ केली आहे, त्याचा परिणाम निकालानंतर दिसेल असा अंदाज राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे.

शक्तिपीठ महामार्गाच्या समर्थनार्थ शेतकऱ्यांनी सातबारासह कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला, या मोर्चाला मिळालेला प्रतिसाद पाहता, राजेश क्षीरसागर आणि शिवाजीराव पाटील शेतकऱ्यांना शक्तिपीठ नको असतानाही शक्तिपीठाच्या समर्थनार्थ कसे ? असा प्रश्न विचारला जात आहे. डोक्यावर बंदूक ठेवून, आंदोलन करा, पाठिंबा द्या. असाच आदेश तर आमदार राजेश क्षीरसागर, आमदार शिवाजीराव पाटील यांना आलेला नाही ना? असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. वास्तविक शक्तिपीठ महामार्गाला जर शेतकऱ्यांचा विरोध नाही तर मग एवढ्या हरकती कशा आल्या, हा प्रश्न शिल्लक राहतोच.

आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वातावरण तापू लागलेले आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी महायुतीत असले तरी जागावाटपावेळी निर्माण होणाऱ्या संघर्षाचा फायदा उठविण्याच्या प्रयत्नात काँग्रेस असल्याचे दिसत असून, काँग्रेसमधील गयारामांना थांबविण्याचाही प्रयत्न सतेज पाटलांकडून होत आहे. महायुतीचा विचार करता घटकपक्षांसदर्भात विचार करता 'तुझं माझं जमेना, अन् तुझ्याशिवाय करमेना' अशी अवस्था महायुतीची झाली आहे. काँग्रेसचे राहुल पाटील आणि त्यांचे बंधू यांना काँग्रेसमधून भाजपात जाण्यापासून थोपविण्याचा प्रयत्न सतेज पाटील करत आहेत. वास्तविक काँग्रेस म्हणून पी.एन. पाटलांनी आपली हयात काँग्रेसमध्ये काढली, करवीर मतदारसंघात काँग्रेसची मोठी ताकदही आहे. २५ वर्ष नरके गट आणि पी.एन.पाटील गटांची भांडणे आहेत. राहूल पाटील काँग्रेस सोडून जावू नयेत, यासाठीही जोरदार प्रयत्न सतेज पाटलांकडून सुरू आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील राजकीय वातावरण आता चांगलेच तापू लागलेले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पराभवाला मागे टाकून काँग्रेसला उभारी देण्याच्या प्रयत्न करत सतेज पाटील एकाकी किल्ला लढवत आहेत.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज,जलद आणि स्मार्ट!

## 'डी. वाय.पाटील'च्या कृषीकन्यांकडून दुग्धव्यवसाय धडे

तळसंदे : हॅलो प्रभात



येथील डॉ.डी.वाय. पाटील कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्यांकडून शिगांव येथे महिलांना दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ व्यवसायाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यक्रम अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. दुग्धोत्पादनात भारत जगात अग्रेसर आहे. कोल्हापूर जिल्हाही उस शेतीबरोबरच दुग्धोत्पादनासाठी प्रसिद्धद आहे. विविध गावमध्ये महिला दुग्व्यव्यवसायात कार्यरत आहे. दुग्धव्यवसायात वाढ व्हावी व शेतकऱ्याला जास्तीत जास्त आर्थिक फायदा व्हावा यासाठी कृषी कन्यांकडून शिगावमध्ये प्रशिक्षण देण्यात आले.

कृषीकन्यांनी शेतकरी महिलांना दुधापासून तयार होणाऱ्या विविध पदार्थांची माहिती दिली यामध्ये लस्सी, खवा, बासुंदी, रसगुल्ला, गुलाबजामून, पनीर, आईस्क्रीम यांच्या पाककृतीची माहिती देऊन या पदार्थांना बाजारपेठे असलेल्या वाढत्या मागणीबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. त्याचबरोबर महिलांना खवा बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाच्या कृषी कन्या साक्षी देसाई, श्रद्धा पाटील, आदिती पाटील, प्रतीक्षा कोळी, सेजल साबळे, माधुरी धनगर आदी सहभागी होत्या.

या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डी. एन.शेलार, अकेडेमीक इनचार्ज प्रा. आर. आर. पाटील, डॉ.एस.एम.घोलपे, प्रा.एम.एन. केंगरे व विषय तज्ज्ञ डॉ.के.बी.कांबळे इत्यादीचे मार्गदर्शन लाभले.

## शिवाजीराव देशमुख यांच्या स्मारकाचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

सांगली : हॅलो प्रभात



माजी विधान परिषद सभापती दिवंगत शिवाजीराव देशमुख यांचे स्मारक बांधण्याकरिता राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीमध्ये आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस आमदार सत्यजीत देशमुख, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, सांगली महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटीलआदि उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शिराळा तालुक्यातील मौजे कोकरुड व मौजे चिंचोली येथील जलसंपदा विभागाची एकूण ४.६७ हेक्टर आर इतकी जागा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याची सूचना केली.

## संक्षिप्त...

### कर्जमाफीसाठी २४ जुलैला राज्यभर 'चक्काजाम'

कोल्हापूर : हॅलो प्रभात



शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन त्यांचा सातबारा कोरा करावा, या प्रमुख मागणीसाठी येत्या २४ जुलै रोजी राज्यभरात 'चक्काजाम' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रहार संघटनेचे नेते व माजी आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे. जोपर्यंत सरकार कर्जमाफीची निश्चित तारीख जाहीर करत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. कसबा बावडा येथील श्री मंगल कार्यालयात आयोजित 'हुंकार मेळाव्या'त त्यांनी चक्काजामचा इशारा दिला.

### श्रावण महिन्यात भरणार भक्तीचा मेळा



सोलापूर : हॅलो प्रभात

सोलापूर शहर हे शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या कार्यामुळे भू-कैलास म्हणून ओळखले जाते. श्रावण महिन्यात सोलापुरात भक्तीचा मळा फुलणार आहे. श्री सिद्धेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटकासह महाराष्ट्रातील शिवभक्तांची गर्दी असते. त्यानिमित्त श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीच्या वतीने जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

## पोलीस दल सक्षम करण्याचा प्रयत्न करू : ना.चंद्रकांत पाटील

### सांगली ग्रामीण पोलीस ठाणे विस्तारीत पहिल्या मजल्याचे लोकार्पण

सांगली : हॅलो प्रभात



पोलीस दलास अत्याधुनिक सोयी सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्नशील असून अधिकचा निधी देऊन पोलीस दल आणखी सक्षम करण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिली.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ च्या निधीतून विस्तारीकरण केलेल्या सांगली ग्रामीण पोलीस ठाण्याचा पहिला मजला विस्तारीकरण व परिसर सुशोभिकरण कामाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आज येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारावकर, सांगली शहरच्या सहाय्यक पोलीस अधीक्षक विमला एम., पोलीस निरीक्षक किरण चौगुले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर, अपर तहसीलदार सांगली अश्विनी वरुटे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, गत काही महिन्यात अमली पदार्थ विरोधी मोहीम प्रभावीपणे राबविल्यामुळे काही गुन्ह्यांच्या प्रमाणात घट झाली आहे व पोलिसांचा चांगला धाक निर्माण झाला आहे. वाढत्या गुन्हेगारीवर वचक बसण्यासाठी सीसीटीव्ही जरूरीचे आहेत. पोलिसांनी सदैव सतर्क, दक्ष राहून काम काज करावे. सांगली पोलीस दलाअंतर्गत सांगली ग्रामीण पोलीस ठाण्याच्या विस्तारीत इमारतीच्या माध्यमातून दुय्यम पोलीस अधिकारी यांना कामकाज करण्याकरिता सोय होणार आहे. तसेच सीसीटीव्ही सर्व्हेलन्स वायफाय कॅमेराच्या माध्यमातून चौकशीकामी येणारे तक्रारदार, तसेच पोलीस यंत्रणेच्या कामकाजावरही लक्ष ठेवण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले.

## अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप

पुणे : हॅलो प्रभात



येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद पुणे च्या वतीने संस्थेच्या कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूल,लक्ष्मीबाई बाबुराव साळुंखे प्रायमरी स्कूल व बालमंदिर मधील विद्यार्थ्यांसाठी खाऊ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी बोलताना संस्थेच्या सरचिटणीस सौ.प्रमिलाताई गायकवाड यांनी अजितदादा एक म्हणजे शिस्तप्रिय नेता, प्रशासनावर मजबूत पकड,कामाचा प्रचंड उरक, सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी यांना सकाळी सहा वाजल्यापासून उपलब्ध असतात. वरकरणी अजितदादा कडक स्वभावाचे वाटत असले तरी संवेदनशील, मायाळू असून मित्रपरिवार, नातेवाईक, कार्यकर्ते यांचे सुखदुःखात सहभागी होणारे नेते आहेत. दिवसाचे १६-१७ तास सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध राहून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आव्हान लिलया पेलणारे अजितदादा पवार म्हणजे महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर तळपणारी तलवारच. सातत्याने गेली ३ दशके महाराष्ट्र राज्याच्या राजकीय-सामाजिक जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या या नेतृत्वाकडे असलेली सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी थक्क करणारी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात वक्तशिरपणासाठी प्रसिद्ध असलेले श्री.अजित पवार नवमहाराष्ट्राचे शिल्पकार आहेत असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रमिलाताई गायकवाड, मुख्याध्यापक अजित माने, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## नैतिक मूल्याच्या आधारे लढाई लढुया, जनता आपल्याला साथ देईल

### आ.जयंतराव पाटील ; सांगली जिल्हा शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न

सांगली : हॅलो प्रभात



आपल्याकडे नीतिमत्ता, नैतिक मूल्ये आहेत. त्यामुळे जनता आपल्याला साथ देईल. आपण संघर्ष करत राहू असे आवाहन माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी केले. सांगली जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मेळाव्यास उपस्थित राहून आ.पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी युवक जिल्हा कार्यकारिणीच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले, विधिमंडळात प्रश्नांची सोडवणूक होताना दिसत नाही. आपल्या भागात द्राक्ष, डाळिंब शेती अतिवृष्टीने नासली. शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळत नाही. तरी कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी असं संबोधतात. मग शब्द मागे घेत सरकारला भिकारी संबोधलं, ते खरंच आहे का? सरकारने शिक्षकांचे अनुदान रखडवले. कंत्राटदरांचे पैसे दिलेले नाहीत. बोगस बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक सुरू आहे.

सर्वसामान्यांच्या जमिनी लाटल्या जात आहेत. कोणीही मागणी न केलेला ८६ हजार कोटींचा शक्तिपीठ महामार्ग लोकांवर लादला जातोय, जोर जबरदस्ती, जुलूम गरिबांवर करण्याची व्यवस्था निर्माण झाली आहे. ठराविक लोकांनी राज्याच्या अर्थव्यवस्थेतून पैसे काढण्याचा मार्ग हुडकला आहे. सरकारवर ९.५ लाख कोटींचे कर्ज आहे.

यावेळी बैठकीस आ.अरुण लाड, जिल्हाध्यक्ष देवराज पाटील, शहर जिल्हाध्यक्ष संजय बजाज, अनिता सगरे, बाबासाहेब मुळीक, जिल्हा उपाध्यक्ष मनोज बाबा शिंदे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब पाटील, युवक जिल्हाध्यक्ष विवेक कोकरे, शरद लाड सर्व सेलचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, आजी माजी लोकप्रतिनिधी, प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



# संपादकीय

## विधानभवन परिसराला राजकीय पुढारी व कार्यकर्ते काय समजतात ?

राज्याचे विधानभवन म्हणजे कायदेमंडळाचे मंदिर व लोकप्रतिनिधीचे भवन या ठिकाणी राज्याच्या विकासाचे, गुन्हेगारांवर लगाम कसण्याचा निर्णय घेणे,मुलभूत प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारांचा प्रश्न, शैक्षणिक प्रश्न, महागाई इत्यादी अनेक महत्वपुर्ण बाबींवर चर्चा करण्याचे व निर्णय घेण्याचे ठिकाण म्हणजे संविधानाने बनवून दिलेले विधानभवन.अशा विधानभवन परिसरात जर राजकीय पुढाऱ्यांचे कार्यकर्ते किंवा राजकीय पुढारी गुंडागर्दी करीत असेल अशा विधानभवनाला किंवा त्या परिसराला काय नाव द्यावे हा मोठा प्रश्न राज्यासमोर व राज्याच्या १४ कोटी जनतेसमोर उपस्थित होतो.राज्याच्या विकासासाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्ये संदर्भात, महागाईच्या संदर्भात किंवा मुलभूत सुविधांच्या संदर्भात राजकीय पुढारी हातापायी करणार नाहीत किंवा आत्महत्याही करणार नाही.परंतु राजकीय वर्चस्वासाठी आणि स्वतःच्या स्वार्थासाठी राजकीय पुढारी व त्यांचे कार्यकर्ते हातापायी करतात व संविधान स्थळाला मलीन करण्याचे काम करतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.अशा अनेक घटना पुर्वी सुध्दा झाल्यात.काही दिवस अगोदर आमदार संजय गायकवाड यांनी विधानभवनाच्या कॅन्टीन मालकाला मारहाण केली त्याचे काय झाले काहीच नाही आणि काही होणार सुध्दा नाही.दिनांक १७ जुलै २०२५ ला विधानभवन परिसरात गोपीचंद पडळकर व जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांत हाणामारी झाली, घाणेरड्या भाषेत शिवीगाळ झाली,कायदेमंडळाच्या मंदिराला काळा डाग लावला ही बातमी मिडिया व वर्तमानपत्राच्या माध्यमातून राज्यासह संपूर्ण देशाच्या कानाकोपऱ्यात हवेसारखी पसरली यामुळे राज्याची बदनामी सुध्दा झाली याचे दुःख राज्याच्या जनतेला आहे परंतु बेशरम राजकीय पुढाऱ्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना तर बिलकुलच नाही ही शोकांतिका आहे.या घृणास्पद घटनेचा राजकीय पुढाऱ्यांवर किंवा त्याच्या कार्यकर्त्यांवर काहीच परिणाम होणार नाही. कारण या संपूर्ण लोकांनी बेशरमीची संपूर्ण हद पार केली आहेत. सध्याच्या परिस्थितीत राजकीय पुढाऱ्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी विधानभवन परिसराला गुंडांचा आखाडा बनविल्याचे स्पष्ट दिसून आले.कारण अशा लज्जास्पद घटना एकावर होतच आहे.परंतु सरकार कारवाईचे फक्त आश्वासन देऊन अशा घटनांवर पांघरूण घालण्याचे काम करीत आहेत. परंतु या गुंडगिरीवर ठोस अशी कोणतीही कारवाई होत नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. अशा घटनांमुळे न्यायव्यवस्थेत मोठी ठेच पोचते व अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मुख्यत्वेकरून राजकीय पुढाऱ्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी थोडीशी तरी लाज शरम ठेवली पाहिजे. विधिमंडळाच्या परिसरात जी घटना घडली ती अत्यंत दुर्दैवी आहे.त्यामुळे जितेंद्र आव्हाड व गोपीचंद पडळकर किंवा संजय गायकवाड यांच्यावर कारवाई अशी करावी की भविष्यात कोणताही आमदार असे घृणास्पद कृत्य करणार नाही.यासाठी एकच सजा आहे ती त्यांना संविधानिक पदावरून हटविणे व विधानभवन परिसरात हाणामारी करणाऱ्यां दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना आजीवन कारावास व्हायला पाहिजे.कारण त्यांनी न्यायपालिकेची व संविधानाची पायमल्ली केली आहे.अशाप्रकारे योग्य कारवाई होत असेल तरच कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहील आणि संविधानिक परिसरात अशा लज्जास्पद घटनांवर आळा बसेल.कारण राजकीय पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना कुस्त्या खेळायच्या असेल व एकामेकांच्या छातीवर बसायचे असेल तर हे कृत्य बाहेर कुठेही करता येते तेथे करावे.कारण विधानभवन परिसरात म्हणजे कोणाच्या बापाची जागीर नसुन ते संविधानिक, कायदेमंदीर व अती संवेदनशील क्षेत्र आहे.याची जाणीव आजी-माजी आमदार, मंत्री व कार्यकर्ते यांनी लक्षात ठेवले पाहिजे.राजकिय पुढाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना एवढी मुभा दिली आहे की सर्वच पक्षांचे आमदार आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन विधिमंडळात येतात.विधिमंडळात त्यांचा मुक्त संचार असतो.आमदारांच्या कार्यकर्त्यांचे विधिमंडळात फोटोसेशन चालते.या संपूर्ण घटनेची दखल घेऊन सरकारने व गृहमंत्रालयाने ताबडतोब अशा घृणास्पद कृत्यावर लगाम कसली पाहिजे अन्यथा अशा घटनांचा फायदा असामाजिक तत्वांचे लोक घेऊ शकतात व अनर्थ होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.

# ब्रिटिशांना सुनावणारे जहालमतवादी नेते लोकमान्य टिळक

**हॅलो प्रभात**

**भारतीय असंतोषाचे जनक समजले जाणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा आज (२३ जुलै रोजी) स्मृतीदिन. लोकमान्य टिळक यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चिखलगाव येथे २३ जुलै १८५६ रोजी झाला. त्यांचे वडिलांचे नाव गंगाधरपंत, तर आईचे नाव पार्वतीबाई होते. त्यांचे संपूर्ण नाव बळवंत गंगाधर टिळक. प्रखर बुद्धीचा विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती होती. भारतात छत्रपती शिवाजी महाराजांनंतर लोकमान्य टिळकांसारखा युगप्रवर्तक महापुरुष दुसरा झाला नाही.**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील 'लाल-बाल-पाल' या त्रयींमधील ते एक होते. भारतीय स्वातंत्र्यसेनानी, शिक्षक, संपादक आणि लेखक अशा विविध भूमिका त्यांनी पार पाडल्या. लोकमान्य टिळक हे स्वराज्याचे पहिले आणि प्रबळ पुरस्कर्ते होते. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक मजबूत जहालवादी नेते होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!' या त्यांच्या घोषणेसाठी ते ओळखले जातात. टिळकांचे बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, अरबिंदो घोष, व्ही.ओ. चिदंबरम पिल्लई आणि मोहम्मद अली जिन्ना यांच्यासह अनेक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नेत्यांशी घनिष्ट संबंध होते.

### ब्रिटिशकाळात तुरुंगवासाची शिक्षा

लोकमान्य टिळकांनी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत ब्रिटिश राजवटीपासून भारतीय स्वायत्ततेसाठी लढा दिला. लोकमान्य टिळक हे जहालमतवादी नेते ओळखले जात असे. टिळक हे कट्टर राष्ट्रवादी परंतु सामाजिक परंपरावादी मानले जात होते. लोकमान्य टिळकांवर १८९७ आणि १९०८ मध्ये असे दोन वेळेस राजद्रोहाचे खटले चालवण्यात आले आहे. १९०६ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा आरोप लावून ब्रिटिशांनी त्यांना अटक केली. २२ जुलै १९०८ साली राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षाही झाली.

### 'राजद्रोह' आणि टिळकांचा कारावास

काँग्रेसमधल्या जहाल गटाचे नेते, स्वराज्य आणि राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते म्हणून टिळकांची ओळख होती. टिळकांवर ११ वर्षांच्या अंतराने दोन वेळा (सन १८९७ आणि सन १९०८) राजद्रोहाचा खटलाही चालवला गेला. १९०८ सालच्या खटल्यानंतर टिळकांना ६ वर्षांची शिक्षा ठोठावली गेली. त्या खटल्यावेळची भारतातील परिस्थिती अत्यंत उलथापालथीची होती. १९०७ साली काँग्रेसमध्ये जहाल आणि मवाळ यांच्यात बेबनाव होऊन फूट पडली होती. १९०८ साली मुझफ्फरपूरमध्ये बॉंबस्फोट झाले आणि त्यानंतर टिळकांच्या 'केसरी' या दैनिकातून त्यावर अग्रलेख, स्फुटं लिहिली जाऊ लागली. ब्रिटीश सत्तेविरोधात लोकांना भडकवल्याचा आरोप करत टिळकांवर राजद्रोहाचा ठपका ठेवण्यात आला. टिळकांनी लिहिलेले 'देशाचे दुर्दैव' आणि 'हे उपाय पुरेसे नाहीत' हे दोन अग्रलेख या खटल्यासाठी आधार म्हणून घेतले गेले.

### राजद्रोहाचा खटला-घटना कशा घडल्या?

● २४ जून १९०८ : टिळकांना मुंबईतल्या सरदारगृह इथून अटक केली गेली. काही दिवसांपूर्वीच टिळक पुण्याहून 'काळ' या दैनिकाचे संपादक श्री. एस. एम. काळे यांना त्यांच्यावर सुरू असलेल्या एका खटल्यात कायदेशीर मदत करण्यासाठी मुंबईत आले होते. २५ जून १९०८ रोजी टिळकांचं घर आणि प्रेस यांच्यावर छापे पडले, यात टिळकांच्या घरातून एक पोस्ट कार्ड




मिळालं ज्यावर स्फोटकांशी संबंधित दोन पुस्तकांची नावं लिहिलेली होती. तिकडे मुंबईत टिळकांचा जामीन अर्ज फेटाळला गेला.

● २६ जून १९०८, मुंबई : टिळकांवर दुसरा आरोप ठेवला गेला आणि तुरुंगातच वॉरंट बजावलं गेलं. कलम १२४- आणि १५३ खाली दोन स्वतंत्र खटले भरले गेले. टिळक या काळात डोंगरीच्या तुरुंगात होते.

● २ आणि ३ जुलै १९०८, मुंबई : जस्टिस दावर यांच्यासमोर मोहम्मद अली जिन्ना यांनी टिळकांच्या जामीन अर्जावर युक्तीवाद केला. जामीन पुन्हा फेटाळला गेला. टिळकांच्या खटल्याच्या सुनावणीसाठी एका विशेष ज्युरीची नेमणूक झाली.

● १३ जुलैपासून खटल्याला सुरुवात झाली. टिळकांवर दोन खटले भरले गेले होते ते एकत्र करून चालवणं कितपत योग्य होतं हा वादाचा विषय ठरला, पण न्यायाधीशांनी त्याला परवानगी दिली.

मराठीतून लिहिलेले दोन अग्रलेख टिळकांवरच्या राजद्रोहाच्या आणि लोकांना भडकवण्याच्या आरोपांचा आधार होते. पण हा खटला ऐकणारी ज्युरी पूर्णतः अमराठी लोकांची होती. यात ७ युरोपीय आणि २ पारशी असे ९ सदस्य होते. जिन्नाह, बाप्टिस्टा या वकिलांनंतर खुद्द टिळकांनीच स्वतःची बाजू मांडली. चार दिवसांत मिळून टिळकांनी एकूण २१ तास १० मिनिटं युक्तीवाद केला, असं खुद्द न्यायाधीशांनीच नोंदवून ठेवलं होतं. २२ जुलैला दुपारी टिळकांचा ज्युरीसमोरचा युक्तीवाद संपला, संध्याकाळी न्यायाधीशांनी हा खटला त्याच दिवशी निकाली काढणार असल्याचं जाहीर केलं.

दुसऱ्याच दिवशी म्हणजे २३ जुलैरोजी टिळकांचा जन्मदिवस होता. टिळकांवरचे तिन्ही आरोप ज्युरीने मान्य केले. टिळकांना दोषी ठरवत कोर्टाने १ हजार रुपयांचा दंड आणि ६ वर्षांचा कारावास सुनावला.

खटला आजच निकाली निघाला हे कळल्यानंतर कोर्टाबाहेर गर्दी जमू लागली. अध्येमध्ये पावसाच्या सरी येत असूनही लोक निकाल येण्याची वाट पाहत थांबले. कोर्टाबाहेर कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर मुंबईत असंतोष पसरला. संताप दिसायला लागला. व्यापाऱ्यांनी बंद पुकारला, गिरणी कामगारांनी संप केला, काही ठिकाणी दंगलीच्याही घटना घडल्या, लष्कराला बोलवून परिस्थिती नियंत्रणात आणावी लागली. या काळात टिळकांना साबरमतीच्या तुरुंगात ठेवलं गेलं. साबरमतीहून टिळकांना बोटीने रंगूनला आणि तिथून मंडालेला तुरुंगात रवाना केलं गेलं.

### मंडालेच्या तुरुंगातले दिवस आणि गीतारहस्य

लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची शिक्षा मंडालेच्या तुरुंगात राहून भोगायची होती. मंडालेच्या तुरुंगात असताना टिळकांनी सुरुवातीचा काळ आपल्या शिक्षेविरोधात अपील करण्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेतलं होतं. पण त्यांच्या अपिलाला हाय कोर्टात यश आलं नाही.

टिळकांनी यानंतर गीतारहस्यच्या लिखाणाला सुरुवात केली. म्यानमारमधील पारागू या लेखकाने टिळकांच्या मंडालेमधील वास्तव्याबद्दल Ganges and Irrawaddy (गंगा आणि इर्रवाडी या अनुक्रमे भारत आणि म्यानमारमधील नद्या आहेत) या आपल्या पुस्तकात लिहिलंय.

पारागू म्हणतात, सुरुवातीला टिळकांना आपल्या अभ्यासासाठी तुरुंगात पुस्तकं आणि संदर्भग्रंथ आणण्यास मनाई करण्यात आली होती. त्यांनी याचा विरोध केला आणि त्यानंतर त्यांना एकावेळी ४ पुस्तकं आणण्याची परवानगी देण्यात आली. असं करत त्यांनी सुमारे ३५०-४०० पुस्तकं तुरुंगात आणली. त्यांना लिखाणासाठी पेन नव्हे तर पेन्सिल दिली गेली होती. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर टिळकांना गीतारहस्यची हस्तलिखितं परत भारतात आणण्यासाठी परवानगी नाकारली गेली, पण त्यांनी त्याला विरोध करून ती हस्तलिखितं भारतात आणली.

### मंडालेमधील टिळकांचं स्मारक

टिळकांच्या सहा वर्षांच्या कारावासाच्या खुणा मंडालेमध्ये त्यांच्या निधनानंतर काही दशकं टिकून होत्या. भारत सरकारने टिळकांसाठी मंडालेच्या तुरुंगाच्या प्रांगणातच ६ एप्रिल १९५९ या दिवशी एक लहानसं स्मारक उभारलं.

# भारतातील पहिला 'बीएससी इन बिझनेस एआय' अभ्यासक्रम सुरू

**मुंबई : हॅलो प्रभात**

भविष्याच्या दृष्टीने शिक्षणाला चालना देण्यासाठी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ (एचबीएसयू) आणि टीमलीज एडटेक यांच्या संयुक्त प्रयत्नातून भारतातील पहिला 'बिझनेस आर्टिफिशियल इंटेलिजन्स' विषयातील पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. हा बीएससी इन बिझनेस एआय अभ्यासक्रम व्यवसाय समज आणि प्रत्यक्ष एआय कौशल्य यांचा समन्वय साधतो, ज्यात कोर्स दरम्यान वर्क एक्सपीरियंस घेण्याची संधीही आहे.

हा अभ्यासक्रम व्यवसाय आणि तंत्रज्ञान या दोन क्षेत्रातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना एआय समजून घेणे, अंमलात आणणे आणि उद्योगांमध्ये त्याचे नेतृत्व करण्याची तयारी या अभ्यासक्रमाद्वारे केली जाईल. एआय टूल्स वापरण्याचे प्रशिक्षण आणि व्यवसाय आधारित शिक्षण यावर भर दिला जातो.

# फिलिप मॉरिसची भारतातील संलग्न कंपनी सन्मानित

**मुंबई : हॅलो प्रभात**

फिलिप मॉरिस इंटरनॅशनल इंक. (पीएमआय)ची भारतातील संलग्न कंपनी आयपीएम इंडियाला कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांमध्ये समानतेची संस्कृती वाढवण्यासाठी जागतिक प्रमाणपत्र मिळाले आहे. ही कंपनी कर्मचाऱ्यांना समान वेतन आणि वाढीच्या समान संधी उपलब्ध करून देणाऱ्या जगातील शीर्ष संस्थांपैकी एक बनली आहे. पीएमआय जिथे जिथे कार्यरत आहेत तिथे, समान कामासाठी सर्व कर्मचाऱ्यांना समान वेतन दिल्याबद्दल हे प्रमाणपत्र इक्वल-सॅलरी फाउंडेशनने दिले आहे. २०१९ पासून आयपीएम इंडियाला तिच्या समान वेतन धोरणांसाठी तिसऱ्यांदा हा पुरस्कार मिळाला आहे. हे प्रमाणपत्र दर्शविते की आयपीएम इंडिया समान वेतनाला प्रोत्साहन देते. यंदा फक्त सामान वेतन नाही तर सामान संधीसाठी देखील हे प्रमाणपत्र आयपीएमला मिळाले आहे. आणि यामुळे कर्मचाऱ्यांची प्रगती तर होईलच पण त्यांची प्रतिभा देखील वाढेल.

# २४ जुलै रोजी पृथ्वीवरील सर्वात मोठ्या केस स्टडीचे अनावरण

**मुंबई : हॅलो प्रभात**



सेव्ह अर्थ मिशनच्या इंडिया चॅप्टरचे अध्यक्ष संदीप चौधरी दूरदर्शी नेतृत्व, आध्यात्मिक विज्ञान आणि ग्रासरूट कृतीचे प्रतीक म्हणून उदयास येत आहेत. संदीप चौधरी २४ जुलै २०२५ रोजी पृथ्वीवरील सर्वात मोठ्या केस स्टडीचे सादरीकरण करणार आहेत, ज्याचे लाइव्ह प्रसारण फर्स्ट इंडिया न्यूज चॅनलवर रात्री ८ वाजता जगभरातील माध्यमे, शास्त्रज्ञ, पर्यावरणवादी आणि धोरण-निर्मात्यांसमोर होईल.

# एचडीएफसी बँकेचे आर्थिक निकाल जाहीर

**पुणे : हॅलो प्रभात**

एचडीएफसी बँकेच्या संचालक मंडळाने १९ जुलै रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी बँकेचे (भारतीय जीएएपी अनुसार) आर्थिक निकाल मंजूर केले. बँकेच्या या खात्यांचा आढावा बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी 'मर्यादित पुनरावलोकन' अंतर्गत घेतला आहे. जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत एचडीएफसी बँकेचे एकूण निव्वळ उत्पन्न ५३१.७ अब्ज इतके झाले, आयपीओ मध्ये 'ऑफर फॉर सेल'च्या माध्यमातून मिळालेला ९१.३ अब्ज रुपयांचा नफा समाविष्ट आहे.

# कॅरेन्स क्लॅव्हिस ईव्हीच्या बुकिंगला सुरुवात


**मुंबई : हॅलो प्रभात**



किया इंडिया या आघाडीच्या मास-प्रीमियम कारमेकर कंपनीने आज त्यांची पहिली मेड-इन-इंडिया ७-सीटर इलेक्ट्रिक वेईकल 'कॅरेन्स क्लॅव्हिस ईव्ही'च्या बुकिंग्जना २२ जुलै २०२५ पासून सुरूवात होण्याची घोषणा केली. ग्राहक २५,००० रूपये सुरूवातीची रक्कम भरत किया इंडियाच्या वेबसाइटवर तसेच देशभरातील किया डिलरशिप्समध्ये कॅरेन्स क्लॅव्हिस ईव्ही बुक करू शकतात. कॅरेन्स क्लॅव्हिस ईव्ही एचटीके प्लस, एचटीएक्स, एचटीएक्स इआर, एचटीएक्स प्लस इआर या ४ व्हेरिएण्ट्समध्ये आणि ग्लेशियर व्हाइट पर्ल, ग्रॅव्हिटी ग्रे, अरोरा ब्लॅक पर्ल, प्युटर ऑलिव्ह, इम्पेरिअल ब्ल्यू व आयव्हरी सिल्व्हर मॅट या ६ रंगांमध्ये उपलब्ध आहे.

# शहापूर ड्रग्जचे धागेदोरे दिल्लीत

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



शहापूर ड्रग्ज प्रकरणातील मुख्य सूत्रधार विक्रेता दिल्लीतील उत्तमनगर येथील असल्याचे तपासात समोर आले आहे. कोरोची येथील सॉफ्टवेअर इंजिनिअर वृषभ खरात याच्याकडून १३४ ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्ज पोलिसांनी जप्त केले. हे ड्रग्ज वृषभ याने दिल्लीतील उत्तमनगर येथे असलेल्या नायजेरियन व्यक्तीकडून आणल्याची कबुली दिली आहे. यामध्ये इचलकरंजी परिसरातील तीन ते चार व्यक्तींची नावे समोर आली आहेत. लवकरच त्यांना ताब्यात घेऊ, असे तपासाधिकारी उपनिरीक्षक महावीर कुटे यांनी सांगितले.

**हॅलो प्रभात**

**राष्ट्रीय प्रसारणाचा दिवस म्हणून २३ जुलै हा दिवस भारतात सर्वत्र साजरा केला जातो. भारतात १९२० च्या दशकात रेडिओ प्रसारण सुरू झाले. पहिला कार्यक्रम १९२३ मध्ये मुंबई रेडिओ क्लबद्वारे प्रसारित झाला. त्यानंतर १९२७मध्ये मुंबई आणि कोलकातामधील खाजगी मालकीच्या ट्रान्समिटर्ससह प्रसारण सेवा सुरू झाली.**

१९३० मध्ये सरकारने या ट्रान्समिटर्सवर कब्जा केला आणि भारतीय ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसच्या नावाने ते प्रसारित करण्यास सुरुवात केली. १९३६ साली त्याचे नाव 'ऑल इंडिया रेडिओ' असे झाले आणि तेव्हापासून ऑल इंडिया रेडिओ (एआयआर) भारताचे राष्ट्रीय प्रसारक म्हणून जनतेला वेगवेगळी माहिती तसेच शिक्षण आणि मनोरंजन करण्यासाठी सेवा देत आहे. त्याच्या अगदी सुरुवातीपासून ते 'बहुजन हिताय, बहुजन सावधान' असे ध्येय ठेवून त्याचे अनुसरण करीत आहे. भाषांची संख्या लक्षात घेता जगातील सर्वात मोठ्या प्रक्षेपण संस्थांपैकी एक म्हणून ऑल इंडिया रेडिओ कार्यरत असून आकाशवाणीकडे देशात ४१३ स्थानके आहेत आणि देशाची ९९.१९% जागा आहे. आकाशवाणीची २३ भाषांमध्ये आणि १४६ बिडांमध्ये प्रसारण केंद्रे आहेत.

### २३ जुलै १९२७ रोजी भारतात रेडिओ प्रसारण

भारतात २३ जुलै १९२७ रोजी रेडिओ प्रसारण सुरू झाले तेव्हा लॉर्ड इरविन यांनी बॉम्बे सेंटर ऑफ इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनीचे उद्घाटन केले. पूर्वी अनेक हौशी रेडिओ संघटनांनी भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी ट्रान्समिटर्सद्वारे फार कमी क्षमतेसह प्रसारण वापरले होते. पहिला रेडिओ क्लब १६ मे १९२८ रोजी मद्रास येथे उघडला गेला आणि हा कार्यक्रम ३१ जुलैपासून सुरू झाला. त्यानंतर २६ ऑगस्ट रोजी कोलकाता केंद्राची स्थापना झाली. त्यावेळी भारतात एकूण १,००० रेडिओ परवाने होते. १९९९ च्या अखेरीस ही संख्या वाढून ६,१५२ झाली. ती १९३२ च्या अखेरीस ८,५५७ पर्यंत पोहोचली. एप्रिल १९३९ पर्यंत एकूण संख्या ७४,००० पर्यंत वाढली. १९३६ मध्ये दिल्ली, १९३७ मध्ये लखनौ, मद्रास, १९३९ पेशावर, लाहोर १९३८ मध्ये ढाका, तिरूचिरापल्ली इ. नवीन केंद्रे उघडली गेली. मार्च १९३० भारतीय ब्रॉडकास्टिंग कंपनी सरकारच्या हातात गेली. त्याला मी. इंडिया ब्रॉडकास्टिंग सर्व्हिस सी म्हणून नाव देण्यात आले. भारत स्वतंत्र झाला तसा, राष्ट्रीय जीवनाच्या इतर पैलूंच्या विकासासह रेडिओचा एक महत्त्वाचा विकास होत गेला. पाच वर्षांच्या योजना अधीन सांस्कृतिक क्षेत्रातही नवीन प्रसारण स्टेशन निर्माण करून प्रत्येक राज्य यातून आपला व्यवसाय वाढवून देशाला मदत करेल, जेणेकरून यामुळे प्रत्येक राज्यात सार्वजनिक सुधारणा होऊन सर्वजण वैविध्यपूर्ण जीवन जगतील म्हणून प्रयत्न केले गेले.

● **जागतिक इतिहास** : हाइनिच रुडॉल्फ हर्टझने इलेक्ट्रोमॅग्नेटिक पॉवरच्या कल्पनेला शास्त्रीय आधार देऊन रेडिओ आणि वायरलेसचे मूलभूत तत्व शोधण्याच्या दिशेने पहिले महत्वाचे पाऊल उचलले. हर्टझ (१८८.९) ब्रिटिश शास्त्रज्ञ मॅक्सवेल आणि पूर्वीचे रशियन वैज्ञानिक पाथफ आणि भारतीय शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बसु यांनी या क्षेत्रात मूळ शोध लावले होते. पण हर्टझ हा पहिला वैज्ञानिक होता जो सिद्ध करण्यात यशस्वी ठरला की विद्युत चुम्बकीय लाटा बऱ्याच ठिकाणी हळुहळू पुढे जाऊ शकतील. त्यांचे वर्तन हे बऱ्याचदा प्रकाशाच्या उष्णता किंवा लाटांसारखेच असते (वेब). याच्या आधारावर १८८६ मध्ये मार्कोनीला दोन मैलांनी सिग्नल (सिग्नल) करण्यासाठी विद्युतशास्त्रीय लाटा पाठविण्यात यश आले. पहिले महायुद्ध करण्यापूर्वी वायरलेस फक्त दूरदर्शन प्रक्षेपण करण्याचे साधन होते. त्यावेळी




वायरलेसला मनोरंजन आणि सार्वजनिक शिक्षणाचा एक माध्यम म्हणून कल्पनेची कल्पना नव्हती. इतर वैज्ञानिक शोध - रेल्वे, विमान, जहाज इत्यादीसारख्या भौगोलिक फरकांचा मागोवा घेण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल होते. प्रसारण (ब्रॉडकास्टींग) च्या विकासाची सुरुवात तेव्हा सुरु झाली जेव्हा वायरलेसचा वापर कमी करण्यासाठी वापरला गेला. १९१४ च्या आधी काही हौशी लोक भाषण आणि संगीत काही अंतरावर प्रसारित करण्यास सक्षम होते. युद्धादरम्यान ऑडिओ प्रसारणाची प्रत्यक्ष प्रगती झाली. युद्धसमूहात थर्मोनिक वाल्व्हची निर्मिती झाली. १९१७ मध्ये कॅनटन डोनोथेर्पे आणि त्याची पत्नी ब्रिटनच्या वायरल ट्रेनिंग कॅम्पसाठी ग्रामोफोन रेकॉर्ड्सचे साप्ताहिक कार्यक्रम प्रसारित करत असत जेणेकरुन प्रशिक्षणाचे नीरस कार्यक्रम मनोरंजक होऊ शकतात.

१९२० च्या दशकात अमेरिकन हौशी जाहिरातदारांनी लहान संगीत कार्यक्रम सादर केले. प्रसिद्ध एन. डी. के. उ. युरोपमधील श्रोत्यांद्वारे ऐकलेल्या मध्यभागी असलेला पहिला कार्यक्रम १९२१ मध्ये प्रसारित झाला. ब्रिटनमध्ये प्रसारण केंद्राची स्थापना करण्याची मागणी होती; परिणामी, मार्कोनी कंपनीला १९२२ मध्ये एक तासभर चालणारा साप्ताहिक कार्यक्रम प्रसारित करण्याची परवानगी मिळाली. लवकरच मार्कोनी कंपनीने आणखी एक स्टेशन ऑपरेट केला जो नंतर लंडन सेंटर म्हणून प्रसिद्ध झाला. अमेरिकेत, जनतेने या नवीन अधिकारांमध्ये विलक्षण रुची दाखवली. त्यांना हे जाणवले की हा शोध म्हणजे एक स्वस्त आणि अप्रतिम मनोरंजन आहे आणि घरी यावर आधारित शिक्षण मिळविण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. रेडिओ निर्मात्यांना, जाहिरातदारांनी आणि वृत्तकर्मींनी ते विकसित करण्याचा प्रयत्न केला. १९२४ च्या वर्षी अमेरिकेत ११०५ ट्रान्समिशन स्टेशन काम करत होते. १९२६ मध्ये सर्व रेडिओ उत्पादक एकत्र आले व त्यांनी नॅशनल ब्रॉडकास्टींग कंपनी बनविण्याचा निर्णय घेतला. पहिल्या महायुद्धानंतर युरोपमधील प्रसारणाच्या विकासाचा वेग वाढला. युद्धामुळे छोट्या आणि ठिसूळ झालेल्या लोकांसाठी प्रसारण म्हणजे प्रेरणा आणि मनोरंजन बनले होते, त्या युरोपीय देशांमध्ये रेडिओ अधिक लोकप्रिय झाला, ज्यासाठी लोक जर्मनी आणि ब्रिटनसारख्या दूरवरच्या देशांमध्ये लढले. फ्रान्स आणि इटली मात्र बऱ्याच काळापासून रेडिओ क्रीडा स्पर्धेपेक्षा अधिक काही करू शकला नाही. युद्धाने राष्ट्रीयत्व आणि आंतरराष्ट्रीयत्वाच्या दोन्ही विकासास प्रोत्साहन दिले आहे. जर आपल्या देशात दिवाळखोरी असेल, तर इतर देशांकडेही जिज्ञासा असतील. या दोन विद्वानांनी प्रसारणाच्या विकासात मदत केली आहे. युद्ध गरीबीनंतर, बेरोजगारी, दु:खे आणि कष्ट यामुळे लोकांच्या स्वरूपात क्रांती घडली आहे. स्कॅनिनेवियन देशांमध्ये रेडिओदेखील लोकप्रिय झाले. याचा प्रभाव स्वीडन, नौका, डेन्मार्क तसेच बाल्कनमधील मध्य युरोप व पूर्व युरोपातून आणि त्याचप्रमाणे दक्षिण अमेरिका आणि मेक्सिकोमध्येही होता. रेडिओ लष्करी शिक्षणासाठी वापरला जात होता. रशियाने क्रांती आणि संघर्षदरम्यान प्रसारित सत्कार केला. १९२४ मध्ये पहिला प्रसारण परवाना रशियाकडे होता. ज्यामुळे रशियन सार्वजनिक नेत्यांनी त्याच्या क्रांतिकारक शिक्षणाच्या स्त्रोतांचे मूल्य आणि परिणाम ओळखता आले. प्रसारणाचे नियोजन विविध देशांच्या परंपरा आणि प्रशासनाशी निगडीत आहे. जेव्हा यूकेने कॉर्पोरेशन सिस्टीमचा अवलंब केला, तेव्हा जर्मनी हा सरकारचा एक भाग म्हणून ओळखला गेला. रेडिओच्या प्रसार यंत्रणा, ब्रॉडकास्टिंगमुळे रशिया हा प्रसिद्धीचा एक शक्तिशाली माध्यमदेखील बनला. अमेरिकेतील आर्थिक क्षेत्राप्रमाणे, प्रसारणास मुक्त उत्साही बनण्याची अनुमती देण्यात आली. भारतामध्ये प्रसारणास एक महत्त्वाकांक्षी मुक्त जागा बनण्याची परवानगी होती.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

हॅलो प्रभात
MY DISTRICT ३
बुधवार, २३ जुलै २०२५

## शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**सांगली : हॅलो प्रभात**

राज्यातील शेतकऱ्यांना विदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख प्रत्यक्ष करून देण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यासदौरे ही योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी दिनांक ३१ जुलै २०२५ पर्यंत संबंधित तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# संमिश्र


## समन्वयकपदी अमित म्हस्केंची नियुक्ती



**पुणे : हॅलो प्रभात**

आम आदमी पार्टीने संघटनेच्या विस्तारासाठी आणि म हाराष्ट्रात प्रामाणिक राजकारणाच्या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी पुणे शहरातील पक्षातील युवा नेते अमित उद्धवराव म्हस्के यांची महाराष्ट्र राज्य समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे.ही नियुक्ती पक्षाचे राष्ट्रीय संयोजकअरविंद केजरीवाल, महाराष्ट्र प्रभारी प्रकाश जरवाल, तसेच महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील यांच्या आदेशाने जाहीर करण्यात आली.नियुक्तीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना अमित म्हस्के म्हणाले, ही केवळ एक पद नाही, तर पक्षाच्या विचारधारेचा आणि प्रामाणिक राजकारणाचा महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात विस्तार करण्याची मोठी जबाबदारी आहे. महाराष्ट्रात प्रामाणिक व पारदर्शक सरकार स्थापन करण्यासाठी मी माझी पूर्ण निष्ठा, ताकद व जिद्द पणाला लावून काम करणार आहे.ही नियुक्ती होण्यापूर्वी म्हस्के यांनी पक्षाचे शहर युवा अध्यक्ष म्हणून पक्षाचे काम पाहिले आहे.

## डीकेटीईच्या विद्यार्थ्यांची क्लासीक फॅशन ऍपेरिएल कंपनीत प्लेसमेंट



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

डीकेटीई मधील टेक्स्टाईल विभागातील सात विद्यार्थ्यांची जॉर्डन येथील क्लासीक फॅशन ऍपेरिएल, या आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये उत्तम पॅकेजवर प्लेसमेंट झाली आहे. यामुळे परदेशात नोकरीची सुवर्णसंधी उपलब्ध करुण देण्याची डीकेटीईची परंपरा कायम राहीली आहे. निवड झालेले सातही विद्यार्थी जॉर्डन येथील क्लासीक फॅशनमध्ये विविध पदावर रुजु झाले आहेत. डीकेटीईचे आंतरराष्ट्रीय युनिव्हर्सिटी व कंपन्या यांच्याशी असलेल्या सामंजस्य करारामुळे विद्यार्थी शिकत असतानाच परदेशातील कंपन्यांमध्ये प्रशिक्षण घेत असतात.यापूर्वी डीकेटीईचे विद्यार्थी अमेरिका,दक्षिण आफ्रिका,थायलंड,व्हिएतनाम,बेहरीन,हॉंगकॉंग,सिंगापूर इत्यादी इंटरनॅशनल कंपन्यांमध्ये उत्तम पॅकेजवरती उच्च पदावर कार्यरत असून त्यांनी डीकेटीईच्या गुणवत्तेला जागतिक पातळीवर सिध्द केले आहे. डीकेटीई मध्ये व्दितीय वर्षापासूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते त्याचबरोबर 'सॉफ्ट स्किल' उपक्रम राबवला जातो. या अंतर्गत कम्युनिकेशन स्किल्स, लॉजीकल थिंकींग, मॅनेजमेंट टेक्निक्स अशा विविध विषयांचे सखोल ज्ञान तज्ञ मार्गदर्शकांव्दारे दिले जाते.विद्यार्थ्यांची प्रि-प्लेसमेंट टेस्ट व्दारे इंटरव्हयूची तयारी करुन घेतली जाते. तसेच विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या कंपनी ट्रेनिंगमूळे विद्यार्थी आत्मविश्वासाने, सक्षमपणे इंटरव्हयूला सामोरे जावून यशस्वी होतात. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व विश्वस्त यांनी शुभेच्छा दिल्या. सदर विद्यार्थ्यांस संचालिका प्रा.डॉ.एल.एस. अडमुठे,उपसंचालक प्रा.डॉ.यु.जे. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या प्लेसमेंटसाठी संस्थेचे टेक्स्टाईलचे टीपीओ प्रा.एस.बी. अकिवाटे यांनी विशेष परीश्रम घेतले.

## नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची झेप




**पिलीव : रघुनाथ देवकर**

प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीवच्या बाबतीत अनेक दिवसापासून नादुरुस्त इमारतीची वास्तवता असून देखील तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.विलास जाधव, डॉ.फुले यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सेवा देण्याच्या बाबतीत प्रामाणिकपणे नियमितता ठेवून सतत नाविन्यपूर्ण उपक्रमातून आपल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्राथमिक केंद्राच्या अंतर्गत असलेल्या गावातील रुग्णांना सेवेबाबत कसलीही अडचण येऊ न देता कामकाज अविरतपणे चालु ठेऊन ग्रामस्थ व रुग्णांच्या मनात चांगले स्थान निर्माण केले आहे. शिवाय आषाढी,कार्तीकी वारीत सेवा देणे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कक्षेत कोणत्याही अपघाती प्रसंगी स्टाफ व आवश्यकता भासल्यास म्बुलन्स सहित तत्पर सेवा देण्याचे काम प्राथमिक आरोग्य केंद्र पिलीव मार्फत करण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. चालू परिस्थितीमध्ये सुद्धा या धकाधकीच्या जीवनामध्ये आणि दानात दान रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे हे ओळखून त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्राम पंचायत पिलीव यांच्या विद्यमाने ग्रामस्थांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, कावीळ लसीकरण असे उपक्रम पिलीव ग्रामपंचायतचे प्रशासक श्री.मिसाळ, ग्रामविकास अधिकारी एस एच भंडलकर पंढरपूर ब्लड बँक यांचे माध्यमातून अतिशय चांगल्या पद्धतीने पार पाडले. यावेळी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी अनिल सावळजकर,पत्रकार संजय पाटील, दामोदर लोखंडे, रघुनाथ देवकर, प्रमोद भैस, शाहरुख मुलाणी, सुजित सातपुते उपस्थित होते.

## निवेदिता माने आर्दश माता पुरस्काराने सन्मानीत

**रुकडी : हॅलो प्रभात**

आधार फाउंडेशन या सामाजिक संस्थे कडून झालेला सन्मान हा माझ्या आयुष्यातील परमोच्य सन्मान असुन हे ऋण न विसरण्या जोगे आहे असे प्रतिपादन माजी खासदार निवेदिता माने यांनी केले. त्या रूकडी (ता. हातकणंगले) येथील आधार फाउंडेशन या सामाजिक संस्थे च्या वतीने आयोजित वर्धापन दिन व आदर्श माता पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी बोलत होत्या अध्यक्षस्थानी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षा सरोज पाटील होत्या.

पुढे बोलताना माने म्हणाल्या आधार फाउंडेशचे काम इतके अप्रतिम आहे की त्या कामाची महाराष्ट्र शासनाला ही नोंद घ्यावी लागली आणि अशा संस्थेने जो माझा माझ्या परिवाराच्या उपस्थितीत आदर्श माता पुरस्कार देऊन गौरव केला तो सन्मान माझ्या संघर्षाच्या काळात ज्या माझ्या सासरच्या म्हणजेच रुकडीच्या लोकांनी पडत्या काळात साथ



दिली त्या मातीतील सर्वोच्च सन्मान आहे त्यामुळे आज मी स्वतःला भरून पावले असून फाउंडेशनचे आणि गावकऱ्यांचे आमच्या घराण्यावरचे ऋण न विसरण्या जोगे आहेत असेही यावेळी त्या म्हणाल्या . या वेळी बोलताना खासदार धैर्यशील माने म्हणाले माझ्या आईच्या या सन्मानाने आम्ही संपूर्ण माने कुटुंबीय भारावून गेलो आहोत. आधार फौंडेशन या संस्थेने आज पर्यंत जाती पतीच्या पलीकडे जाऊन समाजसेवा हाच आपला धर्म मानून काम केले आहे. आधार चे काम हे नेहमीच गावासाठी आणि जिल्हा साठी भूषणावाह असुन या कामासाठी सर्वतोपारी सहकार्य करणार असुन आज पासुन पत्नी वेदांतीका माने यांना आधारच्या कामासाठी समर्पित करत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान यावेळी माजी खासदार निवेदिता माने यांना सरोज पाटील यांच्या हस्ते आदर्श माता हा पूरस्कार प्रदान करण्यात आला. प्रारंभी प्रा. खंडेराव शिंदे लिखित रुकडी गावचा इतिहास या पुस्तकाचे प्रकाशन व विविध क्षेत्रात प्रविण्य प्राप्त केलेल्या विध्यार्थ्यांचा गौरव उपस्थित मान्यवरंच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला वेदांतीका माने, पोलीस पाटील कविता कांबळे, आधारचे संस्थापक संदीप बनकर, सचिन चव्हाण, भगवान पोळ, प्रशांत पाटील, भरत कुंभार यांच्यासह आधारचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी क्षमता ओळखून चांगले करियर करावे : डीवायएसपी सचिन थोरबोले

**तासगाव : हॅलो प्रभात**

सोशल मीडिया वास्तवतेचा विसर पाडते, त्यामुळे आपण अभासी जगात वावरतो. समाजमाध्यमंचा चांगल्या गोष्टीसाठी वापर करावा. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता ओळखून चांगले करिअर करावे असे उद्गार तासगाव पोलीस उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन थोरबोले यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष,महिला तक्रार निवारण समिती,सखी सावित्री मंच,विद्यार्थी विकास आणि कल्याण मंडळ या विभागांतर्गत विद्यार्थी विद्यार्थिनी सुरक्षा प्रबोधन पर कार्यक्रमात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले क्षणिक सुख देणाऱ्या गोष्टी पासून दूर राहा.आई-



वडिलांचा आदर करा चांगले मित्र-मैत्रिणी ठेवा.कधीही अडचण आली तर पोलीस तुमच्या मदतीसाठी नक्कीच येतील.वसंतरावदादा पाटील महाविद्यालयातील विद्यार्थी सुसंस्कारी असल्याबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले.यावेळी पोलीस काका, पोलीस दीदी उपक्रमांतर्गत पोलीस काका हवालदार पंकज माने पोलीस दीदी दिव्या भाट यांची निवड करण्यात आली.

पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती दिली.समाजाची सद्यस्थिती सांगून मुले - मुली शारीरिक आकर्षणाला बळी पडून स्वतःचे जीवन कसे उध्वस्त करतात हे सोदाहरण स्पष्ट केले.शाळा कॉलेजमध्ये आपल्यावर सुसंस्कार केले जातात.आपले वय प्रलोभनाला बळी पडण्याचे आहे म्हणूनच संयम ठेवून व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी पीएसआय विशाल भंडारे,निर्भया पथकाच्या सदस्या माधुरी सदाकळे यांनी आपल्या मनोगतातून प्रबोधन केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे म्हणाले 'विद्यार्थ्यांचा विकास हाच आमचा ध्यास' या उक्तीप्रमाणे शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या स्वप्नातील विद्यार्थी घडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्तावित उपप्राचार्य जे.ए.यादव यांनी केले तर आभार इतिहास विभाग प्रमुख प्रा.पल्लवी मिरजकर यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले.कार्यक्रमाला ज्युनिअर विभागप्रमुख एस.डी. पाटील,निर्भया पथकाचे अंमलदार तुकाराम देशमुख,अक्षय वाघमारे,यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय सेवक वर्ग , विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्धवसेनेकडून संकलित कराच्या बिलाची होळी



शकिल सय्यद यांच्याकडून उपयोग कर्ता कर रद्द ची मागणी

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने माजी नगरसेवक उपजिल्हाप्रमुख शकिल सय्यद यांचे नेतृत्वाखाली उद्धवसेने कडुन संकलित कराच्या बिलाची होळी करण्यात आली. यावेळी इस्लामपूर पालिकेचा जोरदार निषेध करत सन.२०२५ ते मार्च २०२६ अखेरच्या वाढीव संकलित कराच्या बिलाची होळी करणेत आली. यावेळी वाढीव बिल रद्द करा, झोपेचं सोंग घेणाऱ्या पालिका प्रशासनाचा निषेध असो, नहीं चलेगी, नहीं चलेगी हुकुमशाही नहीं चलेगी , कचरा संकलन कर रद्द झाला च पाहिजे अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. या आंदोलनात अशोक चव्हाण,मानव गवंडी,जमिर नालाबधं,अरुण कुपाडे ॲड.विकास लाखे,सिकंदर शेख,विनायक थोरात, रामराव थोरात इकबाल वाईकर,शकिल पटवेकर,दिपक कळसे, नितीन धुमाळ, प्रभाकर कुरळपकर,सुरज गवंडी,आदी शिवसैनिकांनी भाग घेतला होता. यावेळी सय्यद यांनी ही हुकुमशाही चालणार नाही, मालमत्ता धारकांवर हा अन्याय का हा कर पुर्ण तःरद्द करा अन्यथा याही पेक्षा तिव्र जन आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी दिला. यावेळी उप मुख्याधिकारी डॉ भगवान खाडे, पद्मश्री दाईगडे व करविभाग अधिकारी यांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक प्रृथ्वीराज पाटील यांचे शि उद्या शिष्टमंडळासह बैठक घेऊन चर्चेने हा विषय सपंवुया असं शब्द दिलात्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

## विविध उपक्रमांतून देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा

**इंदापूर : हॅलो प्रभात**

इंदापूर तालुका भारतीय जनता पार्टीच्यावतीने इंदापूर येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस विविध उपक्रमांतून साजरा करण्यात आला. यावेळी रक्तदान शिबिर, श्रावण बाळ अनाथाश्रम शाळा येथे गरजू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, फळांचे वाटप व दूध चे वाटप, श्री समर्थ व्यायाम मंडळ संचलित मूकबधिर निवासी शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दुधाचे वाटप केले. यावेळी केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.राधिका रेसिडेन्सी क्लब इंदापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराच्या निमित्ताने



तालुक्यातील रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी तब्बल ४८० रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. नागरिकांसाठी अहोरात्र झटणाऱ्या महाराष्ट्र प्रमुखाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आम्ही स्वयंप्रेरणेतून रक्तदान करण्यास इथवर आलो आहोत अशी प्रतिक्रिया यावेळी राधिका रेसिडेन्सी क्लब येथे आलेल्या रक्तदात्यांनी दिली. योळी बोलताना प्रविण माने म्हणाले की, आपल्या लाडक्या नेत्याचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमातून साजरा व्हावा हा उद्देश मनात बाळगून आपण या कार्यक्रमाचे आयोजन केले. महाराष्ट्र सेवक या समर्पित भावनेतून राज्याचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस हे जनतेशी असलेली आपली बांधीलकी जपत सातत्याने महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय घेत असल्याने प्रत्येक कार्यकर्ता हा त्यांच्याकडे आकर्षित होत असतो, आणि यातूनच समाजाची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळत असते, अशी प्रत्येक भाजपा कार्यकर्त्यांच्या मनात असलेली भावना यावेळी माने यांनी बोलून दाखवली.

यावेळी मयूर पाटील, आकाश कांबळे, मारुती वणवे, माऊली चवरे, बाबासाहेब चवरे, सदानंद शिरदाळे, गजानन वाकसे, तेजस देवकाते, राजकुमार जठार, किरण गाणबोटे, राम आसबे, तानाजी थोरात, नानासाहेब शेंडे, रमेश खारतोडे, अशोक वणवे, सचिन आरडे, माऊली वाघमोडे,सचिन सावंत,लखन जगताप,हर्षवर्धन कांबळे, बिभीषण लोखंडे, रविंद्र देवकर, अमोल मुळे, चांगदेव ढुके,रमेश पाटील, तानाजी मारकड, भारत बोंगाणे,रमेश पाटील, आप्पासाहेब गायकवाड, ड. मयूर शिंदे, सुधिर कोकाटे, आदी उपस्थित होते.

## कृषीमंत्र्यांची मंत्रीपदावरून हकलपट्टी करा : भगवानदास केंगार यांची मागणी

**जत : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील शेतकरी परिस्थितीमुळे व कर्जबाजारीमुळे आत्महत्या करत आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या सावकारी व बँकेचे कर्जे आहेत. असे असताना महाराष्ट्राचे कृषिमंत्री अधिवेशन मध्ये शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नावर उपाययोजना करण्याचे सोडून रमी खेळण्यात मग्न आहेत.महाराष्ट्राचे कृषिमंत्री अनेक वेळा शेतकऱ्यांचे बदनामी करून शेतकऱ्यांच्यावर अनेक वेळा वादग्रस्त वक्तव्ये केली. सत्तेतील अनेक आमदार मंत्री शेतकऱ्यांच्यावर अनेक वादग्रस्त वक्तव्य करत आहेत त्यांना सरकार का पाठीशी घालत आहे.? महाराष्ट्राच्या कृषी मंत्र्यांना रमी खेळण्यासाठी वेळ कमी पडत आहे.

त्यामुळे त्यांना लवकरात लवकर मंत्रिपदावरून पदमुक्त करा अशी मागणी शिवसेना युवा नेते तथा सरपंच सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष भगवानदास केंगार यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

## वासुदेवानंद सरस्वती पतसंस्थेचा सभासदांना १० % लाभांश

**चेअरमन विकास पुजारी**

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथील वासुदेवानंद सरस्वती बिगर शेती पतसंस्थेची अकरावी वार्षिक सभा उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त सुभेदार रवींद्र अनुजे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ कुरुंदवाड चे चेअरमन शरदचंद्र पराडकर हे होते. पाहुण्यांचा परिचय सुधीर वाडीकर यांनी करून दिला. विषय पत्रिकेचे वाचन सचिव रमेश टोपकर यांनी केले. स्वागत बंडोपंत ढोबळे यांनी केले.यावेळी बोलताना पराडकर म्हणाले, संस्कारातून संस्कृती, संस्कृतीतून समृद्धी व सहकारातून आर्थिक उन्नती या ब्रीदवाक्य प्रमाणे काम करणाऱ्या वासुदेवानंद सरस्वती पतसंस्थेने सभासद ठेवीदार कर्जदार यांच्या विश्वासास पात्र ठरत. अवघ्या




दहा वर्षात १८ कोटी ठेवी पर्यंत मजल मारली आहे. त्याचबरोबर महापूर कोरोना सारख्या संकटात सभासदांच्या पाठीशी ठाम सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम गौरवस्पद आहे.यावेळी बोलताना चेअरमन विकास पुजारी म्हणाले, पतसंस्था चालवण्यासाठी चांगले कर्जदार मिळणे अत्यंत गरजेचे आहे. काही वेळेला मनात नसताना कर्ज वसुलीसाठी कठोर निर्णय घ्यावे लागतात. मात्र संस्थेने सभासदांचा विश्वास पात्र केल्याने ठेवींचा १८ कोटीपर्यंतचा टप्पा गाठला आहे. ११ कोटीपर्यंत विविध प्रकारचा कर्ज पुरवठा केला आहे व बहुतांशी कर्जदारांनी वेळेत कर्ज फेडल्यामुळे सभासदांना १०% लाभांश देण्याचा निर्णय घेतला आहे. संचालक मंडळाच्या सहकार्याने कर्मचाऱ्यांनी ससोटीने काम केल्यामुळे संस्थेस ऑडिट वर्ग अ मिळाला आहे. सूत्रसंचालन दत्तात्रय चव्हाण यांनी केले. यावेळी रवींद्र अनुजे, मिलिंद कुलकर्णी, रमेश सुतार, रवींद्र केसरकर, संदीप वाडीकर, आदींनी मनोगते व्यक्त केली. आभार अवधूत जमदग्नी यांनी मानले. यावेळी दत्तराज पतसंस्थेचे चेअरमन हर्षद पुजारी, माजी सरपंच विनिता पुजारी, संजय शिरटीकर आदींसह मान्यवर, सभासद उपस्थित होते.

# कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्त भरतीत बनवा बनवी?

**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी कृषी विद्यापीठाच्या प्रकल्प ग्रस्तांची भरती प्रक्रिया वेगाने सुरु आहे.अनेक वर्षाच्या तपश्चर्या नंतर प्रकल्प ग्रस्तांना न्याय मिळाला आहे हि प्रक्रिया जानेवारी २०२५ पासुन सुरु झाली मात्र वंचित असलेले प्रकल्पग्रस्त नविन दाखले घेण्यासाठी प्रयत्न करत होते. कालावधी कमी असलेने हे दाखले शासनाचा २५ जानेवारी २०२५ च्या शासन निर्णया नुसार कमी वेळेत दाखले मिळविणे शक्य नसल्याने आहिल्यानगरचे पालक मंत्री मा ना राधाकृष्ण विखे पाटील यांना विनंती करून भरती जाहीराची मुदत वाढवून ७ जुलै केली. पुनर्वसन संचालनालया कडून दाखले मिळवण्यासाठी दलालांनी कंबर कसली व या साठी मोठया प्रमाणात पैशेही गोळा केले होते परंतु तेथील अधिकऱ्यांनी गुन्हे दाखल करण्याचा इशारा देताच सर्व दलाल कंपनी या कार्यालयातून मिस्टर इंडिया झालेले दिसुन आले मात्र विद्यापीठाने प्रकल्प ग्रस्त अर्जदारांच्या अर्जाच्या छाननी द्वारे उमेदवाराच्या पात्र अपात्र यादी प्रसिद्ध केल्या पात्र यादीचे वाचन केले असता या यादीत ज्या प्रकल्पग्रस्तांनी पर्वी नोकरीचा लाभ घेतला आहे अशा प्रकल्पग्रस्तांच्या मुलांची नावे अढळून आली आहेत. या बाबत विद्यापीठाच्या कुलसचिवां कडे विचारणा केली असता हा मुद्दा पुनर्वसन कार्यालयाचा असल्याचे सांगितले, परंतु ज्या ज्या वेळी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांचे दाखले घेण्यासाठी लाभार्थींनी अर्ज केले त्या प्रत्येक दाखला मागणी धारकांचा अहवाल पुनर्वसन कार्यालयाकडून मागविण्यात आला होता व मुळ प्रकल्प ग्रस्ताच्या कुटुंबात कोणी नोकरीचा लाभ घेतला आहे काय ? अशी विचारना विद्यापीठाल वेळोवेळी पत्राद्वारे केली होती मग मात्र शंका येते कि हा अहवाल तयार करणाऱ्या विद्यापीठाच्या कोणी कर्मच्याऱ्यांनी एखादया मध्यस्थीला हाताशी धरून हा अहवाल तयार करून पाठवीला कि पुनर्वसन कार्यालयाने काही गोंधळ घालून काही निवडक दलालाना आंधार वाटेने हाताशी धरले हे काम केले हे मात्र शेवटपर्यंत समजु शकले नाही. या पात्र यादीतील बहुतांश उमेदवाराच्या कुटुंबात नोकरीचा लाभ घेऊनही पात्र यादीतील बहुतांश उमेदवारांचे दाखले हस्तांतरीत झालेच कसे असा प्रश्न निर्माण होतो नाही तरी पुर्वी राहुरी कृषी विद्यापीठात नोकर भरतीत पेपर फुटी ,वशिलेबाजी , घोडेबाजार , बनावट कागदपत्रांच्या आधारे लाभ घेणे ,अपगांचे बनावट दाखले जोडून नोकऱ्या मिळविणे ,एकाच कुटुंबातील प्रकल्पग्रस्ताचे दुहेरी लाभ घेणे असे प्रकार नित्याचे झाले आहे.

हे प्रकार उघड होऊनही विद्यापीठ प्रशासनाच्या लक्षात येत नाहीत कि या प्रकाराला विद्यापीठ प्रशासनच खतपाणी घालत आहे असा सवल पैदा होत आहे.

# देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त मिठाई वाटप



**ढालगांव : दत्तात्रय लोखंडे**

प्राथमिक शाळा चोरोची येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य वही, पेन तसेच मिठाई वाटप करण्यात आले.यावेळी भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जाती मोर्चा सांगली उपाध्यक्ष रोहन साबळे यांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विकास सोसायटी चेअरमन जनाप्पा खताळ,शाळा व्यवस्थापन समिती चोरोची अध्यक्ष सुरेश यमगर, पत्रकार तथा जनसेवक दत्तात्रय लोखंडे,इंजिनिअर अर्जुन यमगर, मल्हारी लोखंडे यांच्यासह विविध स्तरांतील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक सौ.सुनीता वसावे यांनी रोहन साबळे यांच्या कार्याचे कोतुक केले. तसेच अशा उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जोपासली जाते असे मनोगत व्यक्त करुन आभार मानले.

# एक्सप्लोर टॅक्टबेल मार्फत विविध भागांना भेटी



**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यात निर्माण होणारी पूर परिस्थिती ची अभ्यास करणे व महापूर नियंत्रणासाठी उपाय योजना करण्यासाठी केंद्र व राज्य शासना मार्फत गेली तिन महीने एक्सप्लोअर टेक्ट बेल या कंपनी मार्फत आज औरवाड नृसिंहवाडी पूल व राजापूर बंधारा या ठिकाणी भेटी दिल्या.सन २०१९ व सन २०२१ च्या महापुराच्या नुकसानी नंतर केंद्र व राज्य शासनाच्या वतीने महापूराचे कारणे शोधणे व उपाय योजना करणेसाठी ही तज्ञाची टिम गेली तिन महीन या भागात ठाण मांडून आहे. कृष्णा नदीतून होणारा पाण्याचा विसर्ग पाण्याची गती, नदीची खोली, रुंदी, नदी प्रवाहामध्ये निर्माण होणारे अडथळे, नदी मध्ये मिळणारे ओढे, नाले, म हापुरामध्ये पाण्याची पातळी वाढल्या नंतर पाण्याच्या प्रवाहामध्ये होणारे बदल याचा भौगोलिक अभ्यास करून पूर नियंत्रणासाठी उपाय करणे, व कर्नाटक वाहून जाणारे पाणी जलद गतीने जावे या सर्व गोष्टींचा पाहणी करण्यासाठी कार्यरत आहेत

या टीममध्ये इंजि. आर्यन देवसिंग, सुनील मिश्रा, प्रदीप मंडल, दीप बंधू मंहातो व पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते, याप्रसंगी जनतेमधून कुतुहोल निर्माण होऊन दर वर्षी निर्माण होणारे महापुराचे संकट निवारण व्हावे, अशी याचना जनते मधून या टीमला होत आहे.

# रमेश थोरात अजित पवार गटाच्या वाटेवर

### १ ऑगस्ट रोजी होणार पक्षप्रवेश ; चर्चेला उधाण

**दौंड : हॅलो प्रभात**

शरद पवार गटातील दौंड मतदारसंघाचे माजी आमदार रमेश थोरात १ ऑगस्टला अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. गत विधानसभा निवडणुकीवेळीच रमेश थोरात हे अजित पवार गटातून शरद पवार गटात आले होते. परंतु आता पुन्हा ते अजित पवार गटात जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यापासून महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी काही उलथापालथ होईल, धक्कादायक घडामोडी घडतील असे दावे केले जात आहेत. विशेष करून राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार आणि शरद पवार हे दोन्ही गट एकत्र येतील, अशा चर्चा रंगल्या आहेत. काही नेत्यांच्या सूचक विधानांमुळे या बळही मिळत आहे. दरम्यान शरद पवार गटातील काही कार्यकर्त्यांना फोडून आपल्या गटात आणण्यासाठी अजित पवार गटाकडून प्रयत्न सुरू असल्याचे आणि त्यासाठी कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्यात आल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडणार आहे. आता शरद पवार गटातील दौंड मतदारसंघाचे माजी आमदार रमेश थोरात १ ऑगस्टला पुन्हा एकदा अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याचे सांगितले जात आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता विकासकामं करायची असतील तर एनडीए सोबत जाण्याशिवाय पर्याय नाही असे ऐकण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी रमेश थोरात यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला होता. दरम्यान आता पुन्हा एकदा रमेश थोरात राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. रमेश थोरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाच्या ध्येय धोरणावर विश्वास व्यक्त करुन पक्षाचे काम प्रामाणिकपणे करण्याचे सक्षम सांगितले. रमेश थोरात आणि शरद पवार गटातील काही कार्यकर्ते अजित पवार गटात जाणार आहेत, अशी माहिती समोर आली आहे.

> गेल्या ४० वर्षांपासून कार्यकर्ते माझ्यासोबत आहेत. त्यांच्या न्यायासाठी मी पक्ष बदलण्याच्या निर्णय घेतला आहे. सध्या कोणतीही विधानसभा किंवा लोकसभा निवडणूक नसली, तरी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांना बळ मिळावे, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रवेशामुळे दौंड मतदारसंघातील राजकारणात मोठे परिवर्तन घडणार असून, अजित पवार गटाला भक्कम ताकद मिळणार आहे.
>
> **–माजी आमदार रमेश थोरात**
> **दौंड मतदारसंघ**



# पाटस परिसरात चोरट्यांचा चोरीचा प्रयत्न फसला ?



## घटना सीसीटीव्ही मध्ये कैद

**दौंड : हॅलो प्रभात**

पाटस ( ता.दौंड ) परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून चोऱ्यांचे सत्र सुरू असून चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास चोऱ्यांचा धडाका लावला आहे. सोमवारी रात्रीही अशाच चोरीच्या घटनांनी पाटस परिसरात चांगलीच खळबळ उडवून दिली आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी पाटस येथील शिंदे वस्ती येथील संजय शिंदे यांची हॅण्डल लॉक करुन ठेवलेली मोटरसायकल एम एच ४२ एएल ११४१ बजाज कंपनीची सीटी १०० मोटरसायकल चोरुन नेली आहे. या प्रकरणी शिंदे यांनी पाटस पोलीस चौकीला तक्रार दाखल केली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, तसेच नागरिकांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे संरक्षण करणे, ही पोलिसांची जबाबदारी आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी. वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी सुरक्षिततेची भावना वाढवण्यासाठी गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे. रात्रीच्या वेळी गस्त वाढल्यास नागरिकांना सुरक्षित वाटेल आणि गुन्हेगारी घटनांना आळा बसेल.

# यशवंत ग्लुकोजच्या संचालक पदी बबन पाटील यांची निवड

**शिराळा : हॅलो प्रभात**

यशवंत सहकारी ग्लुकोज कारखान्याचे संस्थापक संचालक व उपाध्यक्ष कै. आनंदराव पाटील यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाल्याने रिक्त झालेल्या जागी नाटोली गावचे माजी सरपंच बबन राजाराम पाटील यांची संचालक पदी निवड बिनविरोध झाली. यावेळी सहाय्यक निबंधक अजिंक्य इंगवले यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली. तर स्वागत प्रास्ताविक प्रशासन अधिकारी विलास चौगुले यांनी केले. यावेळी रणधीर नाईक म्हणाले, कारखाना उभारणीम ध्ये व राजकीय वाटचालीमध्ये पहिल्या फळीमध्ये उभे राहुन सातत्याने धावपळ करणारे



नाटोली गावचे सुपुत्र आनंदराव पाटील यांचे अचानकपणे आपल्या सर्वांच्या मधून निघून जाने ही कल्पना करू शकत नव्हतो परंतु दुर्दैवानं त्यांचे निधन झाले.

त्यांच्या रिक्त झालेल्या जागेसाठी नाटोली गावचे माजी सरपंच बबन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संचालक मंडळ व गावकऱ्यांनी त्याच्या नावाला सहमती दिल्यामुळे त्यांची कारखान्याच्या संचालक पदी निवड करण्यात आली. आनंदराव पाटील यांच्या निधनामुळे परिसरामध्ये जी मोठी सामाजिक कार्याची पोकळी निर्माण झाली होती ती बबन पाटलांच्या माध्यमातून निश्चितपणे भरून निघेल.यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष शहाजी पाटील, प्रकाश पाटील, रघुनाथ पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. तर सत्यजित नाईक, बाळासो पाटील, एम एस कुंभार राजन पाटील, गजानन पाटील यांच्यासह नाटोली गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# रणजित पाटील यांची संचालक पदी निवड

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक सहकारी बँकेच्या कोपार्डे शाखेच्या संचालक पदासाठी रणजित विठ्ठल पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड शिक्षक नेते दादासाहेब लाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.यावेळी प्राचार्य विठ्ठल पाटील, मुख्याध्यापिका प्रमिला भोसले यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी रणजित पाटील यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. रणजित विठ्ठल पाटील हे शिक्षक वर्गात लोकप्रिय असून, त्यांनी शिक्षकांच्या हितासाठी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या निवडीमुळे कोपार्डे शाखेच्या कामकाजात नवे ऊर्जा आणि कार्यक्षमता येईल, असा विश्वास शिक्षक व सहकारी वर्गाने व्यक्त केला आहे.

# मोहित्यांचे वडगावच्या उपसरपंचपदी युवराज मोहिते



**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

मोहित्यांचे वडगाव ( ता.कडेगाव ) ग्रामपंचायतच्या रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काँग्रेस पक्षाचे,आ.विश्वजीत कदम व युवा नेते शांताराम कदम यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे ग्रामपंचायत सदस्य युवराज मोहिते यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यापूर्वीच्या उपसरपंच सौ.मंदाकिनी मोहिते यांनी आपला कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्या रिक्त झालेल्या पदी युवराज मोहिते यांची निवड उपसरपंच म्हणून करण्यात आली. मोहित्यांचे वडगाव ग्रामपंचायत ही काँग्रेस पक्षाच्या ताब्यात असून सरपंच व सात सदस्य काँग्रेस पक्षाचे आहेत, एक शिवसेना, एक राष्ट्रवादी व दोन भाजप असे संख्याबळ आहे. ग्रामपंचायतच्या सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवड पार पडली. यावेळी सरपंच शितल मोहिते, ग्रामपंचायत सदस्य व माजी उपसरपंच दत्तात्रय मोरे, मंदाकिनी मोहिते, ग्रामपंचायत सदस्य जगन्नाथ मिसाळ, सौ लताताई मोहिते, सौ. रेखाताई मोहिते, सौ.शुभांगी देशमुख, सौ.सारिका मोहिते, राजेंद्र सुतार, माणिक मोहिते, वर्षा मोहिते ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. ग्रामसेवक श्री.शिर्के यांच्या उपस्थितीत उपसरपंच निवडीसाठी युवराज मोहिते यांचा एकमेव अर्ज आल्याने सर्वांनी एकमताने युवराज मोहिते यांची उपसरपंच पदी निवड केली. निवडीनंतर आजी माझी उपसरपंच यांचा सत्कार ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आला. यावेळी लोकनियुक्त मा.सरपंच विजय मोहिते, मा.उपसरपंच दत्तात्रय मोरे, मंदाकिनी मोहिते, मा. उपसरपंच राजाराम मोहिते, सोसायटी चेअरमन लालासो मोहिते, सुदाम मामा विनोद मोहिते, शंकर मोहिते, विजय मोहिते यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल सर्व स्तरात काम करणारी संघटना

## प्रमोद पारिख

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

अल्पावधीतच रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रलने मतदान जनजागृती, बालविवाह प्रतिबंधक रॅली, करिअर गायडन्स सेंटर ,ऑनलाइन टीचर्स ट्रेनिंग, भव्य सायक्लोथॉन, योगा ट्रेनिंग, वृक्षारोपण, झेडपी शाळांना स्टेशनरी, सायकल, एलईडी स्मार्ट लर्निंग पॅनल, कॉम्प्युटर , आटा चक्की, ओपन जिम इत्यादी उपक्रम राबवून रोटरीच्या उज्वल भविष्याची पेरणी करून ठेवली आहे. रोटरी क्लब ही जागतिक संघटना असून ३३ हजार पेक्षा जास्त क्लब जगात पसरले आहेत आणि याचा उपयोग नवीन समाजकार्य घडविण्यासाठी होतो. प्रत्येक रोटरी क्लब हा समाजातील विविध घटकांची गरज ओळखून त्यावर आधारित उपक्रम करण्यावर भर देतात आणि त्यामुळेच आज रोटरी ला संपूर्ण जगात विशेष मान मिळतो. रोटरीचे सर्वात मोठे यश म्हणजे पोलिओ उच्चाटन यानंतरही भविष्यात अनेक कार्यांवर रोटरी काम करणार आहे , रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल ही सर्व स्तरात काम करणारी संघटना म्हणून प्रसिद्ध झाली आहे,

याचा आम्हाला अभिमान वाटतो, असे प्रतिपादन माजी जिल्हा गव्हर्नर (पीडीजी ) प्रमोद पारीख यांनी आपल्या भाषणातून जाहीररीत्या स्पष्ट केले आणि रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रलच्या मागील पाच वर्षात केलेल्या समाजकार्यांचाही



आढावा घेतला.रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल आणि रोट्रॅक्ट क्लब ऑफ संजीवनी युनिव्हर्सिटीच्या पदग्रहण समारंभात माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री प्रमोद पारिख हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी संजीवनी विध्यापिठाचे प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे , सहाय्यक प्रांतपाल रविकिरण डाके, माजी अध्यक्ष राकेश काले, माजी सचिव विशाल आढाव, नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. विनोद मालकर, सचिव विक्रम लोढा हे उपस्थित होते.या कार्यक्रमात रोटरी क्लबचे सहाय्यक प्रांतपाल रविकिरण डाके यांनी प्रांतपाल सुधीर लातूर यांच्याकडून आलेला प्रेरणादायी शुभेच्छा संदेश प्रस्तुत केला. महत्त्वाचे म्हणजे याप्रसंगी रोट्रॅक्ट क्लब ऑफ संजीवनी युनिव्हर्सिटी ची सुद्धा स्थापना करण्यात आली आणि चार्टर अध्यक्ष म्हणून साक्षी राऊत आणि सचिव सिद्धी चुत्तर यांची निवड आणि पदग्रहण संपूर्ण करण्यात आले. चार्टर अध्यक्ष रोहित वाघ यांनी आपल्या क्लबच्या जीवन प्रवासाची एक प्रेरणादायी चित्रफीत सादर केली. मावळते अध्यक्ष राकेश काले यांनी वर्षभरातील सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर केला आणि आपल्या अनुभवांचा खजिना प्रस्तुत केला. यावेळी त्यांनी प्रेसिडेंट कॉलर गोँग आणि ग्यावेल नवनिर्वाचित अध्यक्षांना हस्तांतरित करून पदग्रहण करण्याचे निमंत्रण दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना खजिनदार वीरेश अग्रवाल यांनी आपल्या मुश्किल शैलीने अनेकांची मने जिंकली.

सदरील कार्यक्रमास बोर्ड ऑफ डायरेक्टर देखील घोषित करण्यात आले. शेवटी अमर नरोडे यांनी आभार मानले. याप्रसंगी संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, सर्विस डायरेक्टर सुमित कोल्हे, संजीवनी युनिव्हर्सिटीचे व्हाईस चान्सलर आणि नवीन सदस्य ए.जी. ठाकूर, प्रकाश जाधव, रावसाहेब शेंडगे, इमरान सय्यद, कपिल पवार, हर्षल दोषी, शिवम गीर तसेच रोट्रॅक्ट क्लबची नूतन खजिनदार तिथी मालकर, रोट्रॅक्टर अथर्व चव्हाण, भक्ती लहारे, प्रचिता तनपुरे, वैभव गारे, पियुष बागुल, जय भालेराव, अक्षदा दाते, अथर्व देशमुख, यश धोकचौले, तनुजा गायकवाड, प्रणव घुमरे, कार्तिक गोरडे, शिवम जाधव, श्वेता पलांडे, श्वेता थोरात उपस्थित होते.

# चौगुले कॉलेजमध्ये राष्ट्रीय ध्वज भित्तीपत्रकाचे प्रकाशन

**कोतोली : हॅलो प्रभात**

येथील श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ध्वज दिनानिमित्त भित्तीपत्रक प्रकाशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भित्तीपत्रकाचे प्रकाशन संस्थेचे सचिव शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.बी. एन.रावण (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक) होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहसमन्वयक डॉ.एस.एस. कुरलीकर, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार उपस्थित होत्या. कार्यक्रमास विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांना आरोग्य सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध

**पालकमंत्री चंद्रकांत पाटील**



**सांगली : हॅलो प्रभात**

कोविड पासून सर्वजण वैद्यकीय सेवेच्या बाबतीत सतर्क झाले आहेत. आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी व उत्तम सोयीसुविधा देण्यासाठी शासन कुठेही कमी पडणार नाही. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथे शस्त्रक्रियागृह फेज २, ग्रंथालय व डी. एस. ए. मशीन लोकार्पण, एसटीपी प्लँट कार्यारंभ व वसतिगृह, आंतररूग्ण व बाह्यरूग्ण विभाग दुरूस्ती कार्यारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माजी मंत्री व विद्यमान आमदार डॉ. सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महापालिका आयुक्त सत्यम गांधी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, समित कदम, मकरंद देशपांडे, पदमाकर जगदाळे, डॉ. रूपेश शिंदे, डॉ. प्रिया हुंबाळकर आदि उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. या रूग्णालयात येणारा प्रत्येक माणूस बरा होवूनच जाईल, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रूपेश शिंदे यांनी केले. कार्यक्रमास शासकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थीनी, नागरिक, डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## गोवा बनावटीची २३ लाख ५२ हजारची दारू जप्त

**वैभववाडी पोलिसांची करुळ नाक्यावर मोठी कारवाई**



**गगनबावडा : हॅलो प्रभात**

गोवा बनावटीची दारू वाहतूक करणारा ट्रक वैभववाडी पोलिसांनी ताब्यात घेतला. ही कारवाई करुळ चेक नाका येथे सोमवारी रात्री ३ वा. केली आहे. ट्रक चालक व मालक यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. राकेश राजू हडपद व निलेश साहेबराव साळुंखे रा. शिरोळ कोल्हापूर अशी त्यांची नावे आहेत. ट्रकमधून सुमारे २३ लाख ५२ हजार रुपयांची गोवा बनवटीची दारू व सुमारे १८ लाख रुपये किंमतीचा ट्रक असा ४१ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोमवारी करूळ चेक नाका येथे पोलीस कॉन्स्टेबल हरिष जायभाय, अजय बिल्पे ड्युटीवर कार्यरत होते. रात्री गोव्याहून कोल्हापूर कडे जाणारा ट्रक तपासणीसाठी थांबावला. चालकांकडे चौकशी केली असता ते कधी नागपूरला व नंतर कोल्हापूरला जात आहे. अशी विसंगत व उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे पोलिसांना संशय आला. पोलिसांनी ट्रकच्या हौदयात पाहिले असता, ट्रक मध्ये दारूचे बॉक्स असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने याबाबत वैभववाडी पोलीस ठाणेत माहिती दिली.

पोलीस निरीक्षक मनोज सोनवलकर, पोलीस किरण मेते हे तात्काळ करूळ चेक नाका येथे दाखल झाले. ट्रकचा पंचनामा करून ट्रक पोलीस ठाणेत आणून दारूची मोजदाज करण्यात आली. ट्रॅकमधून ७०० बॉक्स, (प्रत्येक बॉक्स मध्ये १८० मिली च्या ४८ बॉटल होत्या) असा सुमारे २३ लाख ५२ हजार रुपयांची दारू व १८ लाखाचा ट्रक असा सुमारे ४१ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आठ दिवसात गोवा बनावटीच्या दारुवर ही दुसरी कारवाई वैभववाडी पोलिसांनी केली. आठ दिवसापूर्वी कुसूर येथे पाच लाखाची गोवा बनावटीची दारू जप्त केली होती. आतापर्यंतची गोवा बनावटीची ही सर्वात मोठी कारवाई आहे. अधिक तपास वैभववाडी पोलीस करत आहेत.

## एच व्ही देसाई आय हॉस्पिटल येथे ऑप्थॅल्मिक असिस्टंट अभ्यासक्रम

**पुणे : हॅलो प्रभात**

पीबीएमएच्या एच व्ही देसाई आय हॉस्पिटल येथे दोन वर्षांचा डिप्लोमा इन ऑप्थॅल्मिक असिस्टंट अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू झाला आहे. महाराष्ट्र बोर्ड/सेंट्रल बोर्ड व इतर मंडळ मान्यता प्राप्त असलेल्या शाळेतून बारावी उत्तीर्ण असलेल्या ३० विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेता येणार आहे. या अभ्यासक्रमाला नॅशनल कौन्सिल ऑफ व्होकेशनल अँड रिसर्च ट्रेनिंगची मान्यता असून अधिक माहितीसाठी ७८८७७८५२२६ या क्रमांकावर सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत संपर्क साधता येणार आहे.

प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयात अभ्यासक्रमाचा फॉर्म भरून त्यासोबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रति जोडणे गरजेचे आहे. गरजू विद्यार्थ्यांसाठी हडपसर येथे हॉस्पिटल जवळ राहण्याची सोय व जेवणाची सोय किंवा त्यासाठीचे अनुदान आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या काही विद्यार्थ्यांना अनुदान दिले जाईल.

## मराठे प्राथमिक विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

**पुणे : हॅलो प्रभात**

शालेय विद्यार्थ्यांनी कला गुणासह शिक्षण क्षेत्राकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे मत माजी आमदार व गेणबा मोझे विद्यालयाचे संस्थापक/अध्यक्ष रामभाऊ मोझे यांनी व्यक्त केले.



आज शाळेचा पहिला दिवस असल्याने शहरातील विविध शासकीय व निमशासकीय विद्यालयांनी शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांचे विविध प्रकारे उत्साहात स्वागत करण्यात येत असताना खराडी येथील सुंदराबाई मराठे विद्यालयात शिक्षकवृंद यांच्यासह मोझे यांच्या उपस्थितीत शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत प्रसंगी ते बोलत होते. शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांना नवा वर्ग, नवा उत्साह, नवी पुस्तके , नवी उमेद. सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.यादरम्यान विद्यार्थ्यांचा उत्साह अधिक वाढण्यासाठी शाळेच्या इमारतीस फुग्यांची सजावट करून विद्यार्थ्यांचे व पालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अनिल खांदवे तसेच शाळेच्या विविध समित्यांचे सदस्य यांच्या हस्ते नवीन पाठ्यपुस्तकांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. गेनबा सोपानराव मोझे संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार रामभाऊ मोझे यांनी उपस्थित विद्यार्थी , शिक्षक व पालक यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, शालेय समितीच्या अध्यक्षा अलकाताई पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्मार्ट मीटरला मनसेचा विरोध

**महावितरणला खळ खट्याक आंदोलनाचा इशारा**




**उंब्रज : हॅलो प्रभात**

उंब्रज व परिसरातील नागरिकांच्या तक्रारीच्या गंभीर विचार करत महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने महावितरण च्या उपकार्यकारी अभियंता निवेदन सादर केले. उंब्रज महावितरण विभागाअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये स्मार्ट मीटर जबरदस्तीने बसू नयेत, अशी ठाम मागणी यामधून करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

स्मार्ट मीटर संदर्भात नागरिकांच्या तीव्र नाराजी आहे. मनसेच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अनेक ठिकाणी महावितरण कडून डिजिटल मीटर उपलब्ध नाहीत असे सांगून ग्राहकांच्या इच्छेविरोधात स्मार्ट मीटर बसवले जात आहेत.काही ठिकाणी नागरिकांना चुकीची माहिती देऊन त्यांना स्मार्ट मीटर बसवण्यास, भाग पाडण्यात येत आहे याला जोरदार विरोध नोंदवत मनसे पदाधिकाऱ्यांनी म्हटले की, स्मार्ट मीटर हा ऐच्छिक विषय असून त्यासाठी सक्ती करता कामा नये,

या निवेदनात, महावितरण विभागाने याआधी उंब्रज व परिसरातील गावामध्ये जे स्मार्ट मीटर बसवले आहेत, हे आठ दिवसाच्या आत काढावेत व त्या ऐवजी डिजिटल मीटर बसवावेत, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. तसे न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व त्यातून होणाऱ्या नुसकांनी नुकसानीस, महावितरण प्रशासन जबाबदार असेल असा इशारा देण्यात आला आहे.

उंब्रज महावितरण कार्यालयात अधिकारी व कर्मचारी वेळेत उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार येत आहेत.

एवढेच नाही तर महावितरण आवारात अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या निवासाची शासकीय सोय असूनही. ते तेथे राहत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांच्या तक्रारी वेळेवर सोडवल्या जात नाहीत आणि अनेक वेळा गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर रणजीत कदम, तालुका अध्यक्ष विजय वाणी, शहराध्यक्ष अमोल कांबळे, सातारा जिल्हा सचिव शिवराज जाधव, सुमित भिंगार देवे मनसे कार्यकर्ते लिपिक विमल वज आदी मनसे कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

## रमी खेळण्यात मश्गुल असणाऱ्या कृषीमंत्र्यांना मुख्यमंत्र्यांनी पदमुक्त करावे

**शरदचंद्र पवार पक्षाची मागणी**



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राज्यात शेती आणि शेतकरी अडचणीत येत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत आणि विधान सभेच्या सभागृहाचे कामकाज सुरू असताना राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे रमी खेळत आहेत. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांचा तातडीने राजीनामा घ्यावा,अशी मागणी वाळवा तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली. तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने यांच्या हस्ते इस्लामपूर येथे तहसिलदार सचिन पाटील यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव,प्रदेश सदस्या कमल पाटील,वैशाली पाटील,सुजाता पाटील, जयश्री पवार प्रामुख्याने उपस्थित होत्या.

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनातून समाजाला दिशा देण्याचे,सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम करणे जनतेला अपेक्षित आहे. मात्र राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे रमी खेळण्यात मश्गुल आहेत. यासाठी त्यांना मंत्रीपदावर विराजमान केले आहे काय? राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांना तातडीने पदावरून मुक्त करावे.

महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात, रोझा किणीकर, उषा पंडीत-मोरे, मनिषा पेठकर, निता पाटील,भारती तांबवेकर,रुपाली जाधव, पदमजा भाकरे, आश्विनी कोकाटे, रेखा पवार, लताताई पाटील,सायली गोंदील, विद्या भानुसे, नंदाताई पाटील, स्वाती कदम, सुषमा यादव, उषा येवले,शितल पाटील, प्रणिती पाटील यांच्यासह महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

**डिजिटल सखी उपक्रमाने वाळवा तालुका महिला राष्ट्रवादीतर्फे प्रतिकदादा पाटील यांचा वाढदिवस साजरा..**

महिला राष्ट्रवादीच्या वतीने इस्लामपूर येथील पक्ष कार्यालयात महिलांना डिजिटल सखी अंतर्गत डिजिटल प्रशिक्षण देत प्रतिक दादा पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रा.शामराव पाटील यांच्या हस्ते राजारामबापू सहकारी बँकेचे अध्यक्ष विजयराव यादव,उपाध्यक्ष माणिक राव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. संगीता शहा यांनी महिलांना 'डिजिटल वुमन'बद्दल माहिती दिली. प्रा.शामराव पाटील, तालुकाध्यक्षा सुनिता देशमाने, जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

## कौशल्य विकसनातून रोजगारसंधी निर्माण होणार : प्रा.सुरेश पाटील

**कोतोली : हॅलो प्रभात**

जागतिक युवा कौशल्य दिन दरवर्षी १५ जुलै रोजी साजरा केला जातो. या दिनाचा उद्देश तरुणांमध्ये कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देणे, शिक्षण, प्रशिक्षण व रोजगार संधी यांमधील दरी भरून काढणे आणि बेरोजगारी व उद्योजकतेला चालना देणे हा आहे, असे प्रतिपादन कोतोली येथील डॉ. के. एस. चौगुले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मा. सुरेश पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व कौशल्य विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास आणि युवकांना रोजगार संधी या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते. अध्यक्षीय मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, शिक्षणाबरोबरच कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर व्यावसायिक कौशल्याच्या बळावर रोजगाराच्या संधी शोधता येतात. कार्यक्रमास सचिव शिवाजीराव पाटील, प्रा. डॉ. बी. एन. रावण, डॉ एस. एस. एस. कुरलीकर, डॉ. उषा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत डॉ. मनीषा पाटील यांनी केले.

## आस्था संस्थेमार्फत प्राजक्ता कुंभार यांचा सत्कार

**शाहूवाडी : हॅलो प्रभात**

शाहूवाडीतील आस्था अपंग संस्थेमार्फत संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक महादेव कुंभार यांची कन्या प्राजक्ता कुंभार यांची एमपीएससी मधून महसूल सहाय्यक पदी निवड झालेबद्दल दिव्यांग बांधव भगिनींच्या वतीने प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित हा सत्कार करण्यात आला.



निश्चित ध्येय, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यास यातूनच यश मिळाले असल्याचे मत प्राजक्ता कुंभार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक विलास भोसले, केडीसी बँक निरीक्षक एन डी जामदार, प्रकाश कांबळे, प्रा. बाजीराव वारंग ,महादेव कुंभार यांनी मनोगते व्यक्त केली..

कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सल्लागार बी एस पाटील, संपर्कप्रमुख लक्ष्मण भेडसे, उमेश नांगरे, प्रा समीर गुरव,रंगराव ढोके , डॉ सुहास पाटील, सामाजिक कार्यकर्ते रमेश नाईक, कलावती येळवणकर, शालन पाटील, सर्जेराव कळंत्रे सह दिव्यांग बांधव भगिनी उपस्थित होते.

## कोपरगावात रंगणार विवेकभैय्या कोल्हे खुल्या बुद्धिबळ स्पर्धा

### आयोजनाचं चौथे वर्ष : ०४ गट, ६४ रोख बक्षिसं, १३२ चषक

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

रणनीती आणि चातुर्य यांचा मिलाफ असणाऱ्या बुद्धिबळ स्पर्धेची रंगत कोपरगावकरांना याचि देहि याचि डोळा अनुभवता येणार आहे. संजीवनी युवा प्रतिष्ठाण आणि कोपरगाव चेस-स्पोर्ट क्लबच्या संयुक्त विद्यमाने युवानेते विवेकभैय्या कोल्हे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या २ ऑगस्ट (शनिवार) आणि ३ ऑगस्ट (रविवार) रोजी चार गटांत स्पर्धा पार पडेल. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. श्री. विवेक कोल्हे (चेअरमन, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना, कोपरगाव) यांच्या हस्ते स्पर्धेचं उद्घाटन संपन्न होईल.

अहमदनगर डिस्ट्रिक्ट चेस सर्कलच्या मान्यतेनं पार पडणाऱ्या स्पर्धेचं यंदाचं चौथं वर्ष आहे. संत जनार्दन स्वामी आश्रम (भक्तनिवास क्र.२), पुणतांबा फाटा येथे स्पर्धा पार पडतील.




ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने स्पर्धकांनी विहित वेळेत नोंदणी करण्याचं आवाहन संयोजकांच्या वतीनं करण्यात आलं आहे. स्विसलिग पद्धतीने फिडेच्या नियमानुसार स्पर्धा पार पडणार आहेत. सागर गांधी (सोलापूर) आर्बिटर म्हणून काम पाहणार आहेत. ११, १४, १९ वर्षाखालील आणि खुला अशा चार गटांत स्पर्धा होतील. स्पर्धेतील विजेत्यांना जिल्ह्यानिहाय, तालुकानिहाय तसेच मुलींसाठी स्वतंत्र अशी एकूण ६४ रोख आणि १३२ चषक असं भरगच्च बक्षिसांचं स्वरुप असणार आहे.

व्यक्तिगत तसेच मानसिक विकासासाठी बुद्धिबळाचं महत्व अनन्यसाधारण आहे. प्राचीन वारसा लाभलेल्या बुद्धिबळाला आधुनिकतेचा स्पर्श लाभला आहे. कोपरगावातील बुद्धिबळ प्रेमींनी एकत्रित येऊन स्पर्धेचा पाया रचला. ग्रामीण भागातील खेळाडूंना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण उपलब्ध व्हावं आणि खेळाडू घडावे हा आमचा मानस आहे अशी भावना विवेक कोल्हे यांची आहे.

गेल्या चार वर्षांपासून बुद्धिबळ स्पर्धेला युवानेते विवेक कोल्हे यांचे सर्वोपतरी पाठबळ लाभत आहे. त्यामुळे स्पर्धेला अधिक सुनियोजित स्वरुप प्राप्त झालं आहे. वर्षागणिक सहभागींची वाढती संख्या हे स्पर्धेच्या यशाचं द्योतक आहे.

बाहेरगावावरुन येणाऱ्या स्पर्धकांच्या निवासाची व्यवस्था स्पर्धास्थळी करण्यात आली आहे. अशी माहिती नितीन सोळके संस्थापक - कोपरगाव चेस व स्पोर्ट्स क्लब यांनी दिली आहे.

## सविता पाटील यांच्याकडून शाळेला डिजिटल टीव्ही संच भेट



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

वरणगे (ता.करवीर) येथील उपसरपंच सौ सविता विलास पाटील यांनी आपल्या कार्यकालात ग्रामपंचायत मधून मिळणारे मानधन स्वतःसाठी न खर्च करता विद्यामंदिर शाळेतील मुलांना डिजिटल शिक्षणाचा लाभ घेता यावा म्हणून शाळेला स्मार्ट एल.इ.डी. टीव्ही संच भेट दिला. शाळेतील मुलांची शैक्षणिक प्रगती व्हावी, मुलांच्या बुद्धिमत्तेत वाढ व्हावी, मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी याकरिता डिजिटल टीव्ही संच भेट दिला हा माझा छोटासा प्रयत्न आहे असे मनोगत उपसरपंच सविता पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला ज्योतिर्लिंग फर्निचर चे उद्योजक विलास पाटील, विवेक पाटील, सुहास यादव मुख्याध्यापक यशवंत चौगुले केंद्रप्रमुख अश्व रत्न शाळा समितीचे अध्यक्ष दिलीप पाटील, कुलदीप नलवडे, रवी गायकवाड, जाधव सर, केसरकर मॅडम उपस्थित होत्या